AROTE
Dental Clinic
smile more..live more..
डॉ. सौ. स्वप्नाली
अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ :
सकाळी १० ते दुपारी १
व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरडयांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबडयांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा,
नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026
मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०५६ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com | Gmail : punegavkari@gmail.com



# अकोल्यात भाजप-एमआयएम पुन्हा एकत्र

■ AIMIM उमेदवाराचा अर्ज बाद होताच पाचही नगरसेवकांचे भाजपला समर्थन, राजकीय वर्तुळात खळबळ




**अकोला : (समर्थ गांवकरी)**

अकोल्यातील अकोटमध्ये गेल्याच आठवड्यात भाजपने एमआयएम पक्षासोबत युती केली होती. यावरून मोठा गदारोळ झाल्यानंतर युती तोडण्यात आली. तर तिकडे अंबरनाथमध्येही भाजपने कॉंग्रेससोबत युती केली होती. या दोन्ही ठिकाणी भाजपने संबंधित पदाधिकाऱ्यांना नोटीस बजावत कारवाई केली होती. मात्र, आता पुन्हा एकदा अकोटमध्ये भाजप-एमआयएम युतीचा दूसरा अंक सुरू झाल्याचे समोर आले आहे.

अकोटच्या नगरपालिकेत आज स्वीकृत सदस्य निवडण्याच्या प्रक्रियेत भाजप-एमआयएम युती वेगळ्या स्वरूपात पाहायला मिळाली. एमआयएमकडून स्वीकृत नगरसेवक पदासाठी एमआयएमकडून ताज राणा यांचे नाव समोर आले होते, तर भाजपकडून माजी नगराध्यक्ष रामचंद्र बरेठिया यांचा मुलगा जितेन बरेठिया यांनाही उमेदवारी दिली. यात ताज राणा यांनी वेळ निघून गेल्यावर उमेदवारी दाखल केल्याचे कारण देत उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात आला नसल्याचे सांगितले. तसेच एमआयएमच्या पाचही नगरसेवकांनी भाजपच्या जितेन बरेठिया यांना समर्थन दर्शवल्याने ही भाजप-एमआयएमची अप्रत्यक्ष युतीच असल्याची चर्चा रंगली आहे.

दरम्यान, अकोल्याच्या अकोटमध्ये गेल्या आठवड्यात झालेल्या भाजप-एमआयएम युतीवर चांगलाच गदारोळ निर्माण झाला होता. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही युती तोडण्याचे आदेश दिले. तसेच युतीसाठी जबाबदार धरत स्थानिक आमदार प्रकाश भारसाखळे यांना भाजपने कारने दाखवा नोटीस पाठवली. या घटनेनंतर एमआयएम भाजपच्या नेतृत्वाखालील अकोट विकास मंचातून बाहेर पडला होता. यानंतर एमआयएमच्या पाच नगरसेवकांनी स्वतःचा गट स्थापन केला होता. मात्र, पहिल्या युतीने वाद झाल्यानंतर आज परत ही युती नव्याने वेगळ्या रूपात समोर आली आहे.

आगामी महापालिका निवडणुकीसाठी आता काही दिवस शिल्लक असताना राज्यात विविध ठिकाणी घडामोडींना वेग आला आहे.

प्रचारसभा, तसेच उमेदवारांची पळवापळवी देखील सुरू असल्याचे काही ठिकाणी दिसत आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीचा निकाल नेमका काय लागतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## श्रीकृष्ण जन्म महोत्सव भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरा!

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



गं.स्व. चंद्रबाला गिरधरलाल गांधी परिवारातर्फे आयोजित श्रीकृष्णजन्म महोत्सव अत्यंत भक्तिभावाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या प्रसंगी समाजरत्न नानजीभाई खिमजीभाई ठक्कर, प्रसिद्ध कथाकार सुखदेवजी महाराज, तसेच प्रसिद्ध कथाकार जिग्नेशभाई जयेशभाई जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाला रविभाई, निताबेन योगेशभाई गांधी, स्मिता शरदकुमार मेहता, माया पंकजकुमार मेहता, आशा रवींद्र गांधी, सिद्धी विरल गांधी, जिनल अंकित गांधी, बिकल भाविन बुसा, तन्वी प्रतिक मेहता, श्री. राजेंद्र पुराणिक तसेच गांधी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्व भाविकांच्या भक्तीभावामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

यावेळी बोलताना नानजीभाई ठक्कर म्हणाले, "कृष्णाचा जन्म ही केवळ ऐतिहासिक घटना नाही, तर तो एक चिरंतन संदेश आहे. जीवन कितीही अंधकारमय असले तरी भक्तीचा दिवा प्रज्वलित केला, तर देव नक्कीच योग्य मार्ग दाखवतो. 'जेव्हा धर्माची हानी होते आणि अधर्म वाढतो, तेव्हा मी अवतरतो' हा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे." कथावाचक सुखदेवजी महाराज यांनी कृष्णजन्माचे आध्यात्मिक अर्थ उलगडताना सांगितले, "कृष्णाचा जन्म तुरुंगात झाला, याचा अर्थ असा की जेव्हा मन वासना, क्रोध, लोभ व अहंकाराने बांधलेले असते, तेव्हा भक्ती, ज्ञान आणि प्रेमाचा प्रकाश आत्म्यात अवतरतो; आणि त्या क्षणीच 'कृष्णाचा जन्म' होतो." त्यांनी कृष्णजन्माष्टमी ही आंतरिक मुक्तीचा मार्ग दाखवणारी पर्वणी असल्याचेही स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व श्रोते व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भक्ती, ज्ञान व प्रेमाचा संदेश देणारा हा श्रीकृष्णजन्म महोत्सव भाविकांच्या मनात दीर्घकाळ स्मरणात राहील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## सिस्पे घोटाळा...नाव घेतलं नाही तरी काही लोक गडबडलेत



■ विखेंचा लंकेंवर निशाणा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सिस्पे घोटाळ्याची सीबीआय चौकशीची नुसती घोषणा झाली तर काहींचे खुलासे सुरू झाले. तुमचे कोणी नावच घेतले नाही,मग एवढे गडबडता का ?असा सवाल करीत जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला.

पारनेर तालुका खरेदी विक्री संघाने सुरू केलेल्या सोयाबीन खरेदी केंद्राचा शुभारंभ मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांच्या यांच्या उपस्थितीत करण्यात आला. आधीच्या वक्त्यांनी केलेल्या भाषणाचा संदर्भ घेवून मंत्री विखे पाटील यांनी व्यासपीठावर बसलेल्या नेत्यांना सामान्य कार्यकर्त्यांना आधार देण्यासाठी तुम्ही एकत्र राहा असा सल्ला देवून तालुक्याच्या अस्मितेसाठी तुम्हाला यापुढे काम करावे लागणार असल्याचे स्पष्टपणे सांगितले.

तालुक्यात सध्या काय सुरू हे मी सांगण्याची गरज नाही. लोकच मला आता माहीती सांगत आहेत. याचा अर्थ सामान्य माणूस मोकळा झाला आहे. कोणतीही दहशत राहीलेली नाही. सिस्पे घोटाळ्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या भूमिकेने अनेकजण गोंधळले आपोआप खुलासे बाहेर येवू लागले.पण मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते.कोणाचे नावच घेतले नाही तर काहीजण एवढे गडबडले का ?असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

कोणत्याही परिस्थितीत तालुका आपल्याला दुष्काळमुक्त करायचा आहे.जे स्वप्न लोकनेते पद्मभूषण डॉ बाळासाहेब विखे पाटील यांनी पाहीले होते ते पूर्ण करायचे आहे.साकळाई योजनेच्या कामाला सर्व मंजूरी मिळाल्या आहेत.कुकडी प्रकल्पात अधिकचे पाणी निर्माण करण्याचे काम सुरू झाले आहे. डिंबे ते माणिकडोह बोगद्याच्या कामाबरोबरच तालुक्यातील सहा उपसा सिंचन योजनांची काम निर्धारीत वेळेत पूर्ण करण्याचे काम विभागाने सुरू केल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

## जुन्नर नगरपरिषद उपनगराध्यक्षची माळ कोणाच्या गळ्यात पडणार

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर नगरपरिषद उपाध्यक्ष पदाची निवडणूक मंगळवार दिनांक १३ रोजी पार पडत आहे . या निवडकडे पुणे जिल्ह्याचे लक्ष लागले असुन सर्व राजकीय पक्षांची मोर्चे बांधणी जोरदार सुरू आहे . जुन्नर नगर परिषदेमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेना गटाचे नगराध्यक्ष सुजाता काजळे आहेत. नगरपालिकेमध्ये नगरसेवक शिवसेना शिंदे गटाचे ८ न, उपमुख्यमंत्री अजित पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षगटाचे ६ , उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे १ , कॉंग्रेस आय पक्षाचे १ , भारतीय जनता पार्टी पक्षाचे २ , व अपक्ष २ असे एकूण २० नगरसेवक आहेत.

# रेल्वे मार्ग बदल प्रकरणी जनतेच्या भावना समजून घ्या

**बोटा : (समर्थ गांवकरी)**

गेल्या चाळीस दिवसांपासून अहिल्यानगर जिल्ह्यातून जाणाऱ्या प्रस्तावित रेल्वे मार्गाच्या बदलाच्या मुद्द्यावर जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. संगमनेर, अकोले, आळेफाटा, जुन्नर, सिन्नर, मंचर आदी भागातील ग्रामस्थ, शेतकरी, व्यावसायिक आणि लोकप्रतिनिधी यांनी नांदूर खंदरमाळ येथे एकत्र येत "रेल्वेचा पहिला प्रस्तावित मार्गच कायम ठेवावा" अशी ठाम भूमिका मांडली आहे.



या संदर्भात आमदार, खासदार, माजी आमदार व माजी खासदार यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन जनतेची भूमिका स्पष्ट करण्याचे निश्चित झाले होते. मात्र गेल्या वीस दिवसांत कोणताही ठोस किंवा सकारात्मक निर्णय न झाल्याने अकोले तालुक्यातील आंदोलक पुन्हा रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहेत. देवठाण येथे झालेल्या चर्चासत्रात आंदोलन अधिक तीव्र करण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. नगर जिल्ह्यात जिथे-जिथे आंदोलन होईल, त्या सर्व ठिकाणी रेल्वे कृती समिती अकोले सक्रिय सहभाग नोंदवेल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी बोलताना रेल्वे कृती समितीचे प्रणेते बाजीराव दराडे यांनी स्पष्ट इशारा दिला की, "जर पालकमंत्री व मुख्यमंत्री यांना हा जनतेच्या भावना आणि हक्कांचा प्रश्न वाटत नसेल, आणि आमदारांना वेळ दिला जात नसेल, तर जनतेने आमदार-खासदारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे."

स्थानिक पातळीवरील लहान आंदोलनांऐवजी एकच निर्णायक आंदोलन करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. वेळ पडल्यास स्थानिक आंदोलने थांबवून आमदार व खासदारांच्या नेतृत्वाखाली एक भव्य लॉंग मार्च काढून थेट वर्षा निवासस्थान येथे आंदोलन करण्यात येईल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

"पंचवीस ते तीस हजारांचा जनसमुदाय एकत्र येऊन 'ही आमची हक्काची रेल्वे आहे, आमच्यावर अन्याय झाला आहे' हा आवाज राज्य प्रशासनापर्यंत पोहोचवू. न्याय मिळेपर्यंत वर्षा निवासस्थानाचा परिसर सोडणार नाही," असे ठाम मत दराडे यांनी बोटा येथील आंदोलनात मांडले.

शेतीवर उपजीविका करणाऱ्या ग्रामीण भागातील शेतकरी व व्यावसायिकांचा हा प्रश्न केवळ जिल्हास्तरीय न राहता राज्यस्तरीय आहे. जर मुख्यमंत्री व राज्य प्रशासनाने याची तातडीने दखल घेतली नाही, तर मुंबईतील अत्यंत संवेदनशील आणि प्रशासकीय दृष्ट्या महत्त्वाच्या भागात जाऊन राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. अखेर, स्थानिक आमदार व खासदारांच्या माध्यमातून जनतेच्या भावना मुख्यमंत्र्यांनी तात्काळ समजून घ्याव्यात व न्याय द्यावा, अन्यथा ही जनता थेट मलबार हिल येथील मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाकडे कूच करेल, असा ठाम निर्धार रेल्वे कृती समितीच्या वतीने बाजीराव दराडे यांनी व्यक्त केला.

## शिरोली बुद्रुक केसरी कुस्ती स्पर्धांमध्ये यश

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

शिरोली बुद्रुक येथील रामकृष्ण मोरे इंग्लिश मिडियम च्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेमध्ये इयत्ता ९ वी . ची विद्यार्थिनी त्रिशा गणेश वायकर हिचा राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये निवड करण्यात आली. त्रिशा वायकर या विद्यार्थिनीने १५ वयोगटांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला . या शाळेची इयत्ता ९ वी विद्यार्थिनी रेशमा निलेश शेळके व आर्या प्रवीण गव्हाणे यांनी तिसरा क्रमांक पटकावला. किल्ले शिवनेरीच्या मातीतील या विद्यार्थिनींनी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेमध्ये रविवार , दिनांक ४ जानेवारी २०२६ हिवरे पिंपळे या ठिकाणी तालुका शिरूर , जिल्हा पुणे चाचणी कुस्ती स्पर्धेमध्ये उज्वल यश संपादन केले .

## राष्ट्रीय युवा दिन व राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात संपन्न

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




भारतीय तत्त्वज्ञ व तरुणाईचा आदर्श स्वामी विवेकानंद यांची जयंती, 'राष्ट्रीय युवा दिन' तसेच मराठ्यांचा इतिहास घडविणारी, स्वराज्य प्रेरीका, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ यांची जयंती वसुंधरा अकॅडेमीमध्ये उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अभिनव शिक्षण संस्थेच्या कोषाध्यक्ष तथा वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, उपप्राचार्या राधिका नवले तसेच सहाय्यक शिक्षक प्राजक्ता नेटके, वृषाली शेटे, सुनील खताळ व उज्वला मुसळे यांनी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पार्पण करून अभिवादन केले. स्वरा सातपुते, ओम तळोले, निधी वाकचौरे, तन्मय बोडके, ओवैस शेख व स्वामिनी सदगीर या विद्यार्थ्यांनी आपले मनोगते व्यक्त केली. छत्रपती शिवाजी महाराज यांना आदर्श महाराज म्हणून घडविण्यात ज्यांचा मोलाचा वाटा आहे अशा राजमाता जिजाऊ यांच्यावर आधारित एकपात्री प्रयोग सिद्धी मुसळे व सिद्धी जाधव या विद्यार्थिनींनी सादर करत जिजाऊंचे विचार व त्यांचा अंगी असणारा मुत्सद्दीपणा, अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद व समर्पणाची भावना यांची प्रचिती दिली. त्याचबरोबर सफायर द ब्लू हाऊसच्या विद्यार्थ्यांनी विशेष परिपाठ सादर केला. यावेळी प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांनी राजमाता जिजाऊंच्या संस्कारातून छत्रपती शिवाजी महाराज निर्माण झाले, ज्यामुळे शिवाजी महाराज स्वतःसाठी नव्हे तर इतरांसाठी जगले व हिंदवी स्वराज्य स्थापन केले. आजही एक आदर्श राजा म्हणून प्रत्येकाच्या मनात राज्य करत आहेत. पाश्चात्य जगाला वेदांत, योगा व भारतीय संस्कृतीचा संपूर्ण जगाला परिचय ज्यांनी करून दिला ते स्वामी विवेकानंद भारतीय तरुणांच्या विचारांत, कृतीत असायला हवेत असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सफायर द ब्लू हाऊसच्या व्हाईस हाऊस मास्टर उज्वला मुसळे यांनी परिश्रम घेतले. यावेळी अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, सचिव विक्रम नवले, कोषाध्यक्ष तथा कॅम्पस डायरेक्टर प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, सहसचिव प्राचार्या अल्फोन्सा डी यांनी सर्वांना राष्ट्रीय युवा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साईशा शेटे या विद्यार्थिनीने केले.

## महानगरपालिका निवडणूक प्रचारात 'द ग्रेट खली' ची एंट्री

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर येथील महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सुरुवातीपासूनच भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) यांनी आक्रमक प्रचार करत आघाडी घेतली आहे. मतदारांपर्यंत थेट पोहोचण्यासाठी विविध कार्यक्रम, बैठका आणि रॅलींच्या माध्यमातून युतीकडून प्रचाराची धार वाढवण्यात आली आहे.

या प्रचाराला अधिक गती देण्यासाठी भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या युती उमेदवारांच्या समर्थनार्थ आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू द ग्रेट खली अहिल्यानगर शहरात येणार आहेत. त्यांच्या उपस्थितीमुळे प्रचारात मोठी उत्सुकता निर्माण झाली असून, युवकांसह सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष या कार्यक्रमाकडे वेधले गेले आहे. या भव्य प्रचार रॅलीचे नेतृत्व डॉ.सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शना खाली होणार आहे. दोन्ही नेत्यांच्या नेतृत्वाखाली भाजप राष्ट्रवादी युतीने प्रचारात शिस्तबद्ध नियोजन, कार्यकर्त्यांचा जोश आणि विकासाचा अजेंडा पुढे ठेवत आघाडी घेतली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळेच युतीचा प्रचार अधिक संघटित आणि प्रभावी होत असून, शहराच्या सर्वांगीण विकासाचा विश्वास मतदारांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या रॅलीच्या माध्यमातून केला जाणार आहे.

दि. १३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिरापासून दिल्ली गेटपर्यंत भव्य प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीत भाजप आणि राष्ट्रवादी युतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि उमेदवार मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. शहराच्या मध्यवर्ती भागातून निघणारी ही रॅली प्रचारातील महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मानले जात आहे.

### आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंतीनिमित्त संगमनेरमध्ये

# पत्रकारांचा सन्मान सोहळा संपन्न!





**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंती व पत्रकार दिनाचे औचित्य साधून संगमनेर तालुक्यातील पत्रकारांचा भव्य सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. रविवारी (दि. ११ जानेवारी) सकाळी ११ वाजता संगमनेर येथील शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात पत्रकार बांधवांचा मान्यवरांच्या हस्ते मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस , दैनिक समर्थ गावकरी चे मुख्य संपादक डॉ. विश्वासराव आरोटे होते. यावेळी प्रांताधिकारी अरुण उंडे, संगमनेर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे, संगमनेर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर, उत्तर नगर जिल्हा प्रमुख सोमनाथ काळे, जिल्हा सचिव प्रा.राहणे, जिल्हा संपर्क प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, संगमनेर तालुका अध्यक्ष संजय गोपाळे,युवा उद्योजक भूषण शेटे तसेच उद्योजक अशोकराव गोपाळे हे मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते तालुक्यातील पत्रकारांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना वक्त्यांनी पत्रकारितेचे सामाजिक योगदान, लोकशाहीतील पत्रकारांची भूमिका, प्रशासनाने पत्रकारांची वेळोवेळी दखल घेऊन सहकार करण्यात यावे तसेच सत्य आणि निर्भीड पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमानंतर सर्व पत्रकार बांधवांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास संगमनेर तालुक्यातील पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्र. संदीप थोरात , व बाळासाहेब गडाख यांनी केले. या सन्मान सोहळ्याच्या यशस्वी आयोजनाबद्दल पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष संजय गोपाळे यांनी सर्व उपस्थित मान्यवर, पत्रकार बांधव व सहकाऱ्यांचे आभार मानले.

Mangala Mahila Mandal Sanchalit

**MANGALA INSTITIUTE OF NURSING EDUCATION**

Agasti Mandir Marg, Near Wanwashi Kalyan Ashram, Akole, Tal. Akole, Dist. A'Nagar,
Mob.: 8425831719, 9130849667 Email: mangalamahilamandal@gmail.com

**Walk – in – Interview**

Application are invited on paper along with all necessary copies of certificate ,from the eligible candidate for the following posts . qualification and experience as per MNC and MUHS Norms and University direction No 01/2017

| | |
|---|---|
| Professor cum Principal | 01 |
| Professor | 01 |
| Assistant Professor / Lecturer- Medical Surgical Nursing And Community Health Nursing | 02 |
| Tutor /Clinical Instructor | 08 |

Note – For detailed information about the post ,qualification and other terms and condition please visit the college website www.mangalainstitute.org .in or MUHS website for staff Approval Rules and Regulations.Last date of application is in 22/01/2026.

Prof. Dr.Alka Manjrekar
Principal

Dr.Samruddhi Khadse
Secretary & Director General
Mangala Mahila Mandal Sanchalit

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६

# श्रीकांत शिंदेंकडून भाजपचा गेम

## अंबरनाथ नगरपालिकेत राष्ट्रवादीचा उपनगराध्यक्ष, गणितच बिघडलं

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

राज्यात यंदाच्या नगरपालिका निवडणुकीच्या सुरुवातीपासूनच अंबरनाथ नगरपालिका चर्चेत राहिले आहे. कारण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दौऱ्याआधीच गोळीबारामुळे अंबरनाथ गाजले होते. येथील शिवसेना आणि भाजपामधील वाद सर्वश्रुत आहे. त्यातच, गेल्याच आठवड्यात भाजपने काँग्रेसच्या पाठिंब्यावर येथे सत्ता स्थापन केल्यानेही ही नगरपालिका चर्चेत आली होती. अखेर, काँग्रेसने येथील सर्वच नगरसेवकांचे निलंबन केल्यानंतर चक्क भाजपनेच या नगरसेवकांना आपल्या पक्षात प्रवेश दिला होता. आता, येथील नगरपालिकेत शिवसेनेच्या मदतीने अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे सदाशिव पाटील उपनगराध्यक्ष बनले आहेत. त्यामुळे, भाजपला दूर ठेवत शिंदेंच्या शिवसेनेनं राजकीय डाव टाकला आहे.



राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सदाशिव पाटील यांची अंबरनाथ नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदी निवड झाली. येथे खासदार श्रीकांत शिंदेंच्या खेळीने भाजपचा डाव फसला. अंबरनाथ नगरपालिकेत भाजपला वरचढ करत शिंदेंच्या शिवसेनेनं येथील नगर परिषदेमध्ये बहुमताने उमेदवार निवडून आणले. येथे अनुक्रमे शिवसेना-भाजपचे 32 विरुद्ध 28 फरकाने नगरसेवक विजयी झाले आहेत. मात्र, उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीतही भाजपा उमेदवाराचा पराभव झाला. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या खेळीने त्यांनी भाजपाला धोबी पछाड दिला. मात्र, भाजपा आमच्यासोबत आली असती तर आनंद झाला असता, अंबरनाथ नगर परिषदेमध्ये बहुमतात असलो तरी सगळ्यांना सोबत घेऊन विकासाच्या दृष्टीने काम करणार असल्याचे श्रीकांत शिंदे म्हणाले. तसेच, भाजप शिवसेनेसोबतच सत्ता स्थापन करेल असे मला सांगण्यात आले होते, भाजप प्रदेशाध्यक्षांसोबत माझं बोलणंही झालं होतं. मात्र, भाजपने भूमिका बदलल्याने आम्ही राष्ट्रवादीला पाठिंबा दिल्याचेही शिंदेंनी सांगितले.

दरम्यान, 32 नगरसेवकांची संख्या असताना स्वीकृत सदस्य हे शिवसेना महायुतीला तीन मिळायला हवे होते. मात्र, पिठासीन अधिकाऱ्यांनी दोनच स्वीकृत नगरसेवक शिवसेना महायुतीला दिले आहेत. त्या संदर्भात अंबरनाथ पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या सोबत चर्चा झाली असून जिल्हाधिकाऱ्यांकडे या संदर्भात तक्रार करणार असल्याचेही श्रीकांत शिंदे यांनी सांगितले.

### भाजपचा नगराध्यक्ष, राष्ट्रवादीचा उपनगराध्यक्ष

अंबरनाथ नगरपरिषदेवर भाजपचा नगराध्यक्ष निवडून आला असून उपनगराध्यक्ष पद आणि गटनेता पदाची निवड आज करण्यात आली. भाजपने काँग्रेस आणि राष्ट्रवादीला सोबत घेऊन गट स्थापन केल्याचा दावा केला होता. मात्र, खासदार श्रीकांत शिंदे यांनी राष्ट्रवादीच्या चार नगरसेवकांना फोडून स्वतंत्र गट स्थापन केला आहे. त्यानंतर, राष्ट्रवादीच्या उमेदवाराला पाठिंबा देत शिवसेनेनं इथे भाजपला धक्का दिला. त्यामुळेच, कमी संख्या असतानाही राष्ट्रवादीचे सदाशिव पाटील उपनगराध्यक्ष बनले आहेत.

# जे आरक्षणाच्या विरोधात गेले त्यांना मतदान करू नका : मनोज जरांगे

**बुलढाणा : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील महापालिका निवडणुका आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. त्यानुसार सर्वत्र राजकीय पक्षांचा जोरदार प्रचार सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी आपली भूमिका जाहीर केली आहे. जे समाजाच्या विरोधात गेले होते, जे आरक्षणाच्या विरोधात गेले, नेमके तेच आता निवडणुकीत उभे आहेत. त्यांना मतदान करू नका, असे आवाहन जरांगे पाटलांनी केले आहे.

मनोज जरांगे म्हणाले, मराठ्यांनी आता कट्टर आणि कडवट वागले पाहिजे. मुस्लिम दलितांची या सरकारने काडी लावून टाकली. या सरकारचा कार्यक्रम करा. इतकी खुन्नस ठेवायची की यांना मतदान करायचे नाही. आम्ही कसे लोकसभेला एवढा फेस काढला होता. निवडणुकीत पैसे वाटल्याचा आरोप होत नाही, तर यांनी पैसे वाटलेच आहेत. खूप माल आहे यांच्याकडे. यांच्याकडे आधी काय होते? आता खूप पैशांचे बंडल आहेत वाटते. शर्टामधून दिसतील असे बंडल हे सोबत ठेवतात. नोटा वाटतात आणि घोळ करतात. या महापालिकेत कोणासोबत कोणाची युती हेच कळत नाही.

पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, यांचे राष्ट्रवादीसोबत जमते, भाजप शिवसेनेसोबत जमते, काँग्रेससोबतही युती आहे. हे सर्व भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी शिवसेना सगळे एकत्र आले आहेत.

# पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये शिवसेना होतेय मजबूत



**पुणे, प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही शहरांत शिवसेना ( शिंदे गट) यांची राजकीय स्थिती भक्कम होत चालल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये झालेल्या सभा, रॅली, पदयात्रा आणि जनसंपर्क मोहिमांना मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता शिंदे गटाला दोन्ही शहरातील विविध प्रभागांत मोठा पाठिंबा मिळत असल्याचे दिसत आहे.

पुण्यातील मध्यवर्ती भाग, उपनगरं तसेच झोपडपट्टीबहुल परिसरात शिवसेनेच्या उमेदवारांनी आघाडी घेतली असून नागरिकांशी थेट संवाद, स्थानिक प्रश्नांवर ठोस भूमिका आणि विकासाभिमुख अजेंड्यामुळे पक्षाला सकारात्मक प्रतिसाद मिळतो आहे. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, पुनर्विकास आणि महिला सुरक्षेसारख्या मुद्द्यांवर पक्षाने मांडलेली भूमिका मतदारांना भावताना दिसत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातही शिंदे गटाने मजबूत संघटन उभारले आहे. औद्योगिक कामगारवर्ग, मध्यमवर्गीय मतदार आणि नव्या नागरी वसाहतींमध्ये पक्षाच्या प्रचाराला चांगला प्रतिसाद मिळत आहे. स्थानिक पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी घरोघरी भेटी, प्रभागनिहाय बैठकांचे आयोजन आणि सोशल मीडियाद्वारे केलेल्या प्रचारामुळे पक्षाची उपस्थिती अधिक ठळक झाली आहे.

शिंदे गटाने केवळ प्रचारावर भर न देता, प्रत्यक्षात विकासकामांचा आणि प्रशासनातील सहभागाचा मुद्दा पुढे ठेवत "काम करणारी शिवसेना" अशी प्रतिमा निर्माण केली आहे. यामुळे पारंपरिक शिवसेना मतदारांबरोबरच नव्या मतदारवर्गातही विश्वास वाढताना दिसत आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या महत्त्वाच्या शहरी भागांत शिंदे गटाची संघटनात्मक ताकद, कार्यकर्त्यांचा जोश आणि मतदारांशी असलेला थेट संपर्क यामुळे पक्षाची स्थिती मजबूत होत आहे. आगामी निवडणुकांत हा जनाधार मतपेटीत रूपांतरित झाल्यास शिंदे गट शहराच्या राजकारणात निर्णायक भूमिका बजावू शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

दरम्यान, शहरात भाजपने निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केलेली मेगा भरती मोठी चर्चेत राहिली यामुळेच त्यांचा जनाधार कमी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत असून त्यात सत्य असल्याची स्थिती काल भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नेत्यांना कानपिचक्या देऊन मान्य केल्याचे दिसते. तसेच शिवसेना नेते आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुण्यात शिवसेना वाढत असून भाजपचा जनाधार कमी होईल असे म्हंटले आहे.




# 15 जानेवारीला श्री गगनगिरी महाराजांचा पुण्यतिथी सोहळा



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे कुलदैवत, श्रद्धास्थान तीर्थक्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र कोरठण खंडोबागड पिंपळगाव रोठा, ता.पारनेर या राज्यस्तरीय 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रावर गुरुवार दि. १५ जानेवारी रोजी भक्तीमय वातावरणात ब्रह्मलीन परमपूज्य स्वामी गगनगिरी महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळा निमित्ताने सालाबाद प्रमाणे धार्मिक सत्संग, प्रवचन, दिंडी, मिरवणूक, प्रदक्षिणा, महाप्रसाद, दर्शन इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन श्री खंडोबा देवस्थान,जय गगनगिरी सेवाभावी मंडळ पिंपळगाव रोठा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

सकाळी अभिषेक,पूजा होमहवन, यज्ञ सकाळी ९.३० वाजता महाराजांच्या प्रतिमेची रथातून मिरवणुकीने कोरठणगडाला प्रदक्षिणा सहभाग खंडेश्वर वारकरी शिक्षण संस्था विद्यार्थी,जय मल्हार विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ भाविकभक्त यांच्या सहभाग राहील.

सकाळी ११ वाजता आकाश महाराज घोलप यांचे संगीतमय प्रवचन दुपारी १२ वाजता महाप्रसाद अन्नदान जय गगनगिरी सेवाभावी मंडळ पिंपळगाव रोठा आणि शिवभक्त श्री संकल्प संजय विश्वासराव रा. बेल्हे, ता.जुन्नर (श्री क्षेत्र कोरठण गडाचे मूळ मंदिर बांधकाम वंशज) यांचे वतीने सालाबाद प्रमाणे महाप्रसाद नियोजन आहे.

चंपाषष्ठी सन ५ डिसेंबर १९९७ ला तपस्वी परमपूज्य गगनगिरी महाराजांचे शुभ हस्ते लाखो भक्तांच्या मांदियाळीत श्री कोरठण खंडोबा मंदिर नवीन कळस शिखरावर सुवर्ण कलशावरोहण होऊन मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला होता.

त्यानंतर देवस्थानचे वैभव वाढत राहिले तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध झाले.चंपाषष्ठी सन २०१६ मध्ये परमपूज्य श्री गगनगिरी महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना ध्यान मंदिरात करण्यात आली होती. सन २०१७ पासून देवस्थान मध्ये पौष कृ. द्वादशीला दरवर्षी श्री महाराजांचा पुण्यतिथी सोहळा (समाधी दिवस)धार्मिक कार्यक्रमांनी साजरा होत आला आहे.

तरी भाविक भक्त जनतेने दि. १५ जानेवारी रोजी आयोजित या धार्मिक पर्वणीचा, दर्शनाचा, प्रवचन,महाप्रसादाचा अवश्य लाभ घ्यावा असे निवेदन देवस्थान तर्फे तसेच जय गगनगिरी सेवाभावी मंडळ, ग्रामस्थ,भक्तजन यांचे तर्फे करण्यात आले आहे.



नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६. बहुजन समाज पार्टीचे पावणे गाव प्रभाग क्रमांक १४ ड मधील अधिकृत उमेदवार अजय अशोक साळुंखे यांचे प्रभागातील सर्व नागरिकांना नम्र आवाहन– येणाऱ्या १५ तारखेला, चिन्ह क्रमांक ४ समोरील हत्तीचे बटण दाबून मला प्रचंड बहुमताने विजयी करा. मी निवडून आल्यानंतर सामान्य नागरिकांच्या सर्व समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करेन. खरा विकास काय असतो, तो मी निवडून आल्यानंतर प्रत्यक्ष करून दाखवेन. दैनिक समर्थ गावंकरी मंत्रालय प्रतिनिधी विष्णु बुरे नवी मुंबई

## थोडक्यात बातम्या...



### डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीत संवेदन शीलता व जनजागृती वर व्याख्यान संपन्न

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्या नगर मधील विळद घाट येथील डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात संवेदनशीलता व जनजागृती या विषयावर व्याख्यान देण्यात आले. या कार्यक्रमासाठी जिल्हा सत्र न्यायालयाचे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता अँड. तनुजसिंह युवराजसिंग ठाकूर यांनी प्रतिबंध कायद्यातील विविध तरतुदी, कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरणाची गरज, तसेच अंतर्गत तक्रार समितीची रचना, कार्यपद्धती व तक्रारनिवारण प्रक्रियेबाबत अभ्यासपूर्ण प्रभावी मार्गदर्शन केले. महिला कर्मचारी व विद्यार्थीनींनी कामाच्या ठिकाणी आपली सुरक्षितता म्हणून संबंधितांशी वागताना कुठल्या गोष्टीचा स्विकार करावा व कुठल्या गोष्टीला प्रतिकार करावा याचा विचार करुन निर्णय घेणे हे स्वतःवरच अवलंबून आहे. हा मुद्दा स्पष्ट करताना त्यांनी रोडवरील सिग्नलचे उदाहरण देवून समजावले.त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांना झाला. कार्यक्रमासाठी तांत्रिक संचालक प्रा.सुनील कल्हापूरे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.आर. आर.नवथर यांनी कार्यक्रमाचे महत्व अधोरेखित करत कायद्याबाबत जागरूकता निर्माण होणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. डॉ.एस.एस.मगर यांनी प्रास्तविक केले. प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ.एस.ए.मरकड, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग, कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी श्री.विवेक पाटेकर आभार मानले.अशा प्रकारच्या जनजागृतीपर उपक्रमांमुळे महाविद्यालयीन परिसरात सुरक्षित, सन्मानजनक व संवेदनशील वातावरण निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल.असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

### ८३ वैशिष्ट्ये अंगिकारल्यास मुले स्वंय प्रकाशाने चमकतील : सौ. रेणूताई दांडेकर

अहिल्यानगर (स. गांवकरी) : ज्ञानसाधना, निर्णयक्षमता, सहनशीलता,संयमशीलता, रागावर नियंत्रण, संवादपध्दती, भाषेचा अभिमान अशी ८३ वैशिष्ट्ये ज्ञानेश्वरांनी व्यक्तिमत्व विकासाची सांगितली आहेत. याकरीता कुठल्याही क्लास जायची गरज नाही हे आपल्याकडे आहे देवाची व्याख्या संत ज्ञानेश्वर करतात समोर येणारा प्रत्येक सजीव देव आहे अशी ८३ वैशिष्ट्ये ज्ञानेश्वरीत आहेत की जी शाळेने किंवा कोणी घेतली त्यांच्या ओव्या, उदाहरण आहेत ही अंगिकारल्यास सगळी मुले स्वंयप्रकाशाने चमकतील अशी माझी खात्री आहे. असे प्रतिपादन शिक्षणतज्ज्ञ व लेखिका सौ. रेणूताई दांडेकर यांनी केले. ज्ञानसंपदा स्कूल आयोजित १५ व्या ज्ञानसंपदा व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प शिक्षणतज्ञ व लेखिका सौ. रेणूताई दांडेकर यांचे व्यक्तिमत्व विकास या विषयावर गुंफले. मानद संस्थेचे खजिनदार अविनाश बोपर्डीकर, रविंद्र साताळकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. रेणुताई दांडेकर पुढे म्हणाल्या की,ज्या प्रमाणे मूर्ती घडवताना जसे मूर्तीकार नको असलेला भाग काढतो मूर्तीत भावना निर्माण करतो.मूर्तीमध्ये आत्मतत्व असते. मूर्तीतील प्राणतत्व महत्वाचे आहे त्याप्रमाणेच आपण आपल्यात बदल केला पाहीजे कोणत्याही मोठ्या माणसानी व्यक्तिमत्व विकासाचा कोर्स केला नव्हता तरी त्यांच्याकडे पाहून आपण प्रेरणा घेणे व आपल्याला माणूस म्हणून घडविणे. मुलांचा व्यक्तिमत्व विकास करण्याची पहिली जबाबदारी आईवडीलांची. मुलांवर चांगले संस्कार करणे दुसऱ्याचे गुणतत्व शोधणे व ती आपल्यात आणणे ही व्यक्तिमत्वाची एक महत्वाची बाजू असते.

### राधाकृष्ण विखे पाटील यांची वसंत लोढा यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट



अहिल्यानगर (स. गांवकरी) : देशात व राज्यात भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे उमेदवार मोठ्या संख्येने निवडून येतील. यापूर्वी देखील अहिल्यानगर येथे भाजपाने महापौर पद भूषविले आहे. भारतीय जनता पार्टीने अहिल्यानगर शहरात मोठ्या प्रमाणात विकास केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील नगरच्या विकासासाठी मोठा निधी दिला आहे.या महानगरपालिकेच्या निवडणुकीत अहिल्यानगर शहरामध्ये भारतीय जनता पार्टी चा महापौर होईल.यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू. असे प्रतिपादन भाजपाचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा यांनी केले आहे. पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी भाजपाचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता माजी शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर,ज्येष्ठ नेते सुनील रामदासी,समन्वयक विनायकराव देशमुख,माजी नगराध्यक्ष लता भाभी लोढा,उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, कुणाल भंडारी,प्राचार्य सुनील पंडित आदी उपस्थित होते. पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले,भारतीय जनता पार्टी विकासाच्या मुद्द्यावर महानगरपालिकेची निवडणूक लढवीत आहे.यंदाच्या वर्षी भारतीय जनता पार्टीने महानगरपालिकेच्या निवडणुकीत तरुणांना संधी दिली आहे. अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी भारतीय जनता पार्टी कटिबद्ध आहे. भारतीय जनता पार्टीचे उमेदवार मोठ्या संख्येने निवडून यावेत.

## मातंग समाजाला न्याय देणार - ना. राधाकृष्ण विखे पाटील

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



भाजपा कार्यकर्त्यांची नाराजी दूर करण्यासाठी पालकमंत्री स्वतः त्याच्या घरी भेट देऊन त्यांना प्रचारात सक्रिय होण्याचे आवाहन करत आहे आज त्यांनी सिद्धार्थ नगर येथे पंडीत वाघमारे सर यांच्या घरी भेट दिली. व आश्वासन दिले मातंग समाजाला पुढील काळात न्याय देणार यामुळे कार्यकर्त्यात उत्साह संचारला आहे.

यावेळी पंडित वाघमारे यांनी महानगर पालिका निवडणुकीत समाजावर अन्याय झाल्याची व समाजाला योग्य प्रतिनिधित्व मिळत नसल्याची भावना व्यक्त केली.त्यामुळे समाजातील तरुण वर्गात मोठ्या प्रमाणावर असंतोष आहे हे निदर्शनास आणून दिले व सिद्धार्थ नगर, रामवाडी व इतर झोपडपट्टीतील नागरी समस्या तसेच महानगर पालिका कर्मचाऱ्याच्या समास्या मांडल्या.

यावर बोलताना ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी, समाजाच्या भावना लक्ष्यात घेऊन पुढील काळात योग्य तो सन्मान राखून समाजाला न्याय देऊ असे आश्वासन दिले. तसेच भाजपा चे जिल्हा सरचिटणीस पंडित वाघमारे यांनी या साठी पुढाकार घेऊन समाजाचे प्रश्न थेट माझ्या कडे मांडावेत मी त्यावर कार्यवाही करेल असा विश्वास दिला. निवडणुकी नंतर वाघमारे यांचे माध्यमातून दोन्ही झोपडपट्टी साठी भरीव निधी उपलब्ध करुन देऊ असे आश्वासन दिले.अनंत लोखंडे यांनीही समाज्याचे प्रश्न मांडले. या प्रसंगी जय मल्हार योगी मठ मठादीपती योगी योगेश्वरनाथजी अभय आगरकर, विनायक देशमुख यांचे सह हिंदुराष्ट्र सेनेचे जिल्हाध्यक्ष संजय आडोळे,नितीन दिनकर नीरज राठोड हे नेते उपस्थित होते.

समाजाचे ज्येष्ठ विठ्ठल उमाप व समाजातील तरुण राज शेलार, विकास घोरपडे, अक्षय दिवटे, सुनील घोरपडे, सोनु साठे, अजय गाडे, राहुल शिंदे,केवल नवगिरे, अविनाश घोरपडे, बलराज दळवी, रोहित घोपडे,आकाश सरोदे, बाळासाहेब उमाप ई कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## वधू वर परिचय मेळावा २०२६ संपन्न

**(समर्थ गांवकरी)**

सकल लेवा समाज कल्याण (मध्यवर्ती) मंडळ नाशिक व सर्व विभागीय मंडळे तसेच भोरगाव पंचायत ठाया पाडळसे (नाशिक विभाग) यांच्या संयुक्त विद्यमानाने सुदर्शन लॉन्स इंदिरानगर नाशिक येथे ,आयोजित सामूहिक विवाह सोहळा ,वधू वर सूची प्रकाशन तसेच वधू वर परिचय मेळावा २०२६ आज मोठ्या उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला सामूहिक विवाह मध्ये ५ जोडपी सहभागी झालेली होती. त्यांना संसार उपयोगी वस्तूंचा सेट मंडळाकडून भेट देण्यात आला त्यानंतर वधू वर परिचय मेळावा घेण्यात आला आजचा कार्यक्रम ज्यांच्या संकल्पना प्रोत्साहन आणि मार्गदर्शनातून उभा राहिला असे लेवा समाज कल्याण (मध्यवर्ती) मंडळाचे अध्यक्ष श्री संजय वायकोळे आजारी असल्यामुळे त्यांच्या जबाबदारीची धुरा अध्यक्ष म्हणून श्री अरविंद अत्तरदे यांनी सांभाळली आजच्या मेळाव्यासाठी लेवा समाजाचे कुटुंबनायक श्री ललित दादा पाटील तसेच डॉ सौ स्मिता चौधरी चेअरमन रुद्र द प्रॅक्टिकल स्कूल नाशिक श्री दीपक पाटील सौ निशा अत्तरदे सौ भाग्यश्री पाचपांडे डॉ. ज्ञानेश्वर पाटील श्री दिनेश भंगाळे श्री ज्ञानेदेव भारंबे श्री विकास चौधरी हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री अरविंद अत्तरदे यांनी केले या मेळाव्यात नियोजित वधू व वर यांनी अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात मोकळेपणाने आपला परिचय करून दिला आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ भावना सरोदे यांनी केले.

## महाविकास आघाडीचा निश्चयनामा विकास आराखडा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



अभिषेक कळमकर

नुकत्याच झालेल्या अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महाविकास आघाडीच्या निश्चयनामा प्रकाशन कार्यक्रमात बोलताना माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. सत्ताधारी हुकूमशाही पद्धतीचे राजकारण करत असून शासकीय व स्वायत्त संस्था, विशेषतः मनपा आयुक्त, हे स्थानिक आमदाराच्या ताटाखालचे मांजर असल्यासारखे वागत असल्याचा आरोप त्यांनी केला. सध्या सत्ताधाऱ्यांना पराभवाची इतकी भीती वाटू लागली आहे की त्यांनी आमच्या उमेदवारावर कट्टा दाखवून दादागिरी केल्याचा गंभीर आरोपही कळमकर यांनी यावेळी केला. अशा प्रकारच्या दहशतीच्या राजकारणाला जनता योग्य वेळी उत्तर देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या कार्यकाळाचा उल्लेख करताना कळमकर म्हणाले की, अवघ्या २३ व्या वर्षी महापौर असताना त्यांनी ४० कोटी रुपयांचा निधी शहरासाठी आणला आणि पुढील ३० वर्षांचे दृष्टीकोन ठेवून विकासकामांचे नियोजन केले. मात्र, केवळ ११ महिन्यांचा कार्यकाळ मिळाल्याने अनेक कामे अपूर्ण राहिली. सध्या जाहीर करण्यात आलेला महाविकास आघाडीचा निश्चयनामा हा अहिल्यानगरच्या पुढील २५ वर्षांचा विकास आराखडा असून शहराला आधुनिक आणि सर्वांगीण विकासाच्या दिशेने नेणारा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## मतदान जनजागृती बद्दल मुख्यमंत्री, सभापती यांनी केले आर्ट ऑफ लिव्हिंगचे कौतुक





**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सभापती ना राम शिंदे नुकतेच नगरला येऊन गेले यावेळी त्यांना आर्ट ऑफ लिव्हिंग च्या शाखेने मतदान जनजागृती बाबत केलेल्या कार्याची माहिती प्रा डॉ सुपर्णा देशमुख यांनी दिली यावेळी त्यांनी केलेल्या कामगिरीचे कौतुक केले व मनपा निवडणुकीत हि मतदान जनजागृती करा असे आवाहन केले.

विधानसभा निवडणुकीसाठी अहिल्यानगर शहरातील आर्ट ऑफ लिव्हिंग च्या शाखेने अत्यंत अभिमानास्पद कामगिरी बजावली होती. अवघा एक आठवडाभर संपूर्ण अहिल्यानगर शहरातील विविध भागात जाऊन दररोज बाईकरॅली काढून, माईक द्वारे, पथनाट्ये व संगीताद्वारे जनजागृती सर्व नागरिकांना मतदान करण्यासाठी जागरूक करण्यात आले. मतदाता जागरूक व्हावा यासाठी प्रत्येक भागात विभागात पॅम्प्लेट वाटून मतदान करण्यासाठी शपथ घेतली गेली. या दरम्यान जवळपास वीस हजार नागरिकांना मतदान करण्यासाठी शपथ दिली गेली. तसेच आपलं मतदान आपला अधिकार या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून जयश्रीताई फडणवीस उपस्थित होत्या, या कार्यक्रमाद्वारे उपस्थित एक हजार विविध नागरीकांना मतदानाची शपथ दिली गेली. मतदानाचे प्रमाण गेल्या विधानसभा निवडणुकीत प्रचंड प्रमाणात वाढलेले बघून महाराष्ट्र राज्य शासनाने प्रमाणपत्र देऊन आर्ट ऑफ लिव्हिंग अहिल्यानगर शाखेचा गौरव केला.

या उपक्रमास यशस्वी करण्यासाठी प्रा डॉ सुपर्णा देशमुख जिल्हा शिक्षक समन्वयक, श्री राजेन्द्र पाचे व श्री चंद्रकांत तागड टीओके कमिटी मेंबर्स, श्री पांडुरंग दातीर डीडीसी मेंबर, श्री भूषण मालू यूथ कोऑर्डिनेटर, व प्रशिक्षक श्री नरेंद्र बोठे व इतर अनेक साधकांनी परिश्रम घेतले होते.

# मुख्यमंत्री प्रशासन यांनी रेल्वे संदर्भातील जनतेचे प्रश्न भावना समजून घ्या

## अन्यथा पुढील आंदोलन वर्षा निवास स्थान मलबार हिल येथे होईल – बाजीराव दराडे

- मुख्यमंत्री सडक योजनेतील रस्ते कामात कोट्यवधींचा घोटाळा
- ठिकठिकाणी निकृष्ट रस्ते, ग्रामस्थांचा उग्र इशारा



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री सडक योजना अंतर्गत अकोले तालुका, जिल्हा अहिल्यानगर येथे सुरू असलेल्या गाव-जोड वाडी-जोड रस्त्यांच्या कामात मोठ्या प्रमाणावर निकृष्ट दर्जा व आर्थिक अपहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या योजनेचा उद्देश ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे हा असताना, प्रत्यक्षात ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांनी कामाऐवजी बिले कशी अदा होतील यावरच भर दिल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

अकोले तालुक्यातील गर्दनी–बारामती रोड ते मुख्य रस्ता, पिंपळगाव निपाणी ते तालुका हद्द, लिंगदेव–धुपे, हिवरगाव गणोरे–खातोडे वस्ती, वाघजाळी–ई जीमा २७, मोरेवाडी–खैरदरा, सांगडेवाडी–कुरकुंडी, कोठेबु–वनकुटे, ई जीमा १८–बहिरवाडी असे अनेक रस्ते प्रगतीपथावर असल्याचे दाखवले जात असले, तरी प्रत्यक्ष काम मात्र अत्यंत तोकडे असल्याचा आरोप आहे.

प्राथमिक माहितीनुसार मार्च २०२५ मध्ये प्रत्यक्ष काम न करता खोदकाम, भरावा, खडीकरण, सिमेंट काँक्रीट आदी कामांची खोटी नोंद करून अंदाजे ५ कोटी रुपये आगाऊ स्वरूपात अदा करण्यात आले. प्रत्यक्षात खोदकाम व भराव अत्यल्प प्रमाणात झाल्याने रस्त्यांची रुंदीकरण, चढ-उतार व वळण सुधारणा झालीच नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

GSB कमी जाडीचे दाखवून पूर्ण बिल अदा करण्यात आले. ड्रायलीन काँक्रीटमध्ये निकृष्ट खडी, जास्त फ्लाय अॅश व कमी सिमेंट वापरल्याने दर्जा ढासळला आहे. परिणामी अनेक ठिकाणी ड्रायलीन काँक्रीट उखडलेले दिसून येते. काँक्रीट रस्त्याचा अंतिम थर PQC मध्येही कमी प्रतीचे सिमेंट, निकृष्ट वाळू व खडी वापरल्याने तीन महिन्यांतच संपूर्ण रस्त्यावर तडे पडले आहेत. या गतीने काम राहिल्यास रस्ते दोन वर्षांतच पूर्णपणे खराब होतील, असा इशारा देण्यात आला.

ग्रामस्थांनी मागणी केली आहे की, खराब झालेला अंतिम थर (PQC) पूर्णपणे काढून नव्याने काँक्रीट करावे. ज्या ठिकाणी GSB झालेले नाही किंवा ड्रायलीन निकृष्ट आहे, त्या कामांचे पेमेंट ठेकेदारांना अदा करू नये.

सर्व कामांची तपासणी गुणनियंत्रण, नाशिक विभाग यांच्याकडून करून घेतल्यानंतरच पुढील कामे सुरू करावीत. या प्रकरणी माजी जिल्हा परिषद सदस्य बाजीराव दराडे यांनी तीव्र इशारा देत सांगितले की, निकृष्ट व बोगस कामे थांबवली नाहीत तर प्रत्येक ठिकाणचे ग्रामस्थ स्वतः पोकलेन/जेसीबी लावून रस्ते उखडून टाकतील. संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन गुणवत्तापूर्ण काम सुनिश्चित करावे, अन्यथा आंदोलन अटळ असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# आपल्या लिखाणातून कुणाचे जीवन उध्वस्त होऊ नये : डॉ. विश्वासराव आरोटे

- राज्य पत्रकार संघाच्या वतीने निघोज येथे पत्रकार सन्मान सोहळा

(समर्थ गांवकरी)



समाजासाठी आपल्या लेखनीच्या माध्यमातून अहोरात्र काम करणारे पत्रकार हे सामाजिक सेवेचे भान ठेवून काम करून समाजाला न्याय देन्याचे कामच करतात.पण कुठेतरी चुकीचे काम होते आणि आपल्या लिखाणातून कुणाचे जीवन जर उध्वस्त होतं असेल तर अशी पत्रकारिता योग्य नाही असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सचिव डॉ . विश्वासराव आरोटे यांनी केले निघोज येथे केले. राज्य पत्रकार संघाने पत्रकार दिना निमित्त आयोजित केलेल्या पत्रकार सन्मानसोहळ्यात ते बोलत होते.

निघोज येथील श्रीमळगंगा ग्रामविकास ट्रस्टच्या सभागृहामधे पत्रकार सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे हे होते.कार्यक्रमाच्या सुरवातीला आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर आणि श्रीमाता मळगंगा देवीच्या प्रतिमेचे पूजन करून दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरवात झाली.

यावेळी बोलताना,डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले,पत्रकार हा निपक्षपाती असावा. कुणाच्या अति जवळ जाऊन त्याने आपली चुंबळ करून घेऊ नये.त्यापेक्षा शोध पत्रकारिता करावी.

सद्या सोशल मीडिया जगाच्या पाठीवर पुढे जात असताना प्रिंट मीडियावर अजूनही वाचकांचा विश्वास कायम आहे.हे सिद्ध झालय. कोरोना काळात 240 पत्रकारांचा मृत्यू झाला. त्यांना शासनाच्या अगोदर कुणी मदत केली असेल ती राज्य पत्रकार संघाने केली. पत्रकारांच्या सुखात आणि दुःखात त्यांच्या पाठीशी संघटना कायम उभी असते. अनेक राज्यात संघटना कार्यरत आहें. आमदार, खासदार मंत्री माजी होतात. पत्रकार आणि शिक्षक कधीच माजी होतं नाही. 28 जिल्हे आणि 238 तालुक्यातून मंत्रालयापर्यंत संवाद यात्रा काढत शासनाकडे 22 मागण्या केल्या. बहुतांश मागण्या शासनाने मान्य केल्या.अजूनही काही मागण्यांसाठी लढा द्यायचा आहें. पत्रकार आणि विक्रेते यांना न्याय मिळावा म्हणून आर्थिक महामंडळ शासनाने करण्याची घोषणा केली. पत्रकारासाठी 50 कोटींचे विमा कवच देण्याची घोषणा तत्कालीन मंत्री राजेश टोपेनी केली पण ती घोषणाचं राहिली. पण संघटना पत्रकाराच्या मागे भक्कमपणे उभी राहते असेही आरोटे म्हणाले.

पत्रकराणने राजकारणी मंडळींच्या ती,जवळ जाऊ नये. मग ते तुम्हाला ग्राह्य धरतात,म्हणून पत्रकारांने कुणाचेही प्यादे होऊ नका. पारनेरचा पत्रकार देशात कुठेही गेला , तरी त्याला त्या ठिकाणी मदत मिळाली पाहिजे, असे संघटन आम्ही संपूर्ण राज्यात केले आहे.कोरोना काळात निधन झालेल्या पत्रकारांना आम्ही मदत केली.आम्ही देणारे आहोत,घेणारे नाही. पदे येतील , जातील , पण समाजासाठी तळमळीने काम करणाऱ्या पत्रकारांच्या पाठीशी संघटना कायम उभी आहे.

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कार्याध्यक्ष वसंतराव कवादसर म्हणाले,समाजा मध्ये परिवर्तन घडवण्याची ताकद पत्रकारामध्येच आहे. श्रीमळगंगा देवस्थान ट्रस्टचे कार्य लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी पत्रकारांनी आम्हाला केलेली मदत कधीही विसरता येणार नाही. आज समाजामध्ये अनेक समस्या आहेत. समाज जागृतीसाठी पत्रकारांनी यापुढील काळात करावे. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस आर एस कापसेसर यांनीही पत्रकारांच्या कार्याचा गौरव केला आणि आमदार काशिनाथ दाटेसर यांचे वतीने पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

अध्यक्ष स्थाना वरून बोलताना राज्य पत्रकार संघाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे म्हणाले,लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेला पत्रकार हा फक्त बातमी देणारा नाही तर तो समाजमनाचा आरसा आहे. बातमीतील सत्यता पडताळून आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे काम पत्रकारच करत असतो असेही गाडगे म्हणाले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य सुरेश खोसे पाटील यांनी प्रास्ताविक व सुत्रसंचालन करताना पत्रकार संघाचे महत्त्व विशद करत डॉ.आरोटे यांच्या कार्याचा गौरव केला.

याप्रसंगी संघटनेचे जिल्हा प्रसिद्ध प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे,ज्येष्ठ पत्रकार दत्ता उनवणे,मुकुंदराव निघोजकर,पत्रकार संघाच्या इलेक्ट्रॉनिक मीडियाचे जिल्हा प्रमुख विनोद गायकवाड, तालुका सचिव संतोष कोरडे , सहसचिव सोमनाथ गोपाळे, उपाध्यक्ष वसंत रांधवण , श्रीनिवास शिंदे,निघोज शहराध्यक्ष सचिन जाधव,पत्रकार अनिल चौधरी , दिपक वरखडे , विकास शेंडकर , संपत वैरागर,भगवान मंदिलकर , विजय रासकर,नितीन परंडवाल, सुनिल लोणकर,जयदीप कारखिले,आनंदा भुकन,सागर आतकर, रोहन उनवणे, व श्रीगोंदा येथील पत्रकार मेजर उल्हारे,पत्रकार सीमा उल्हारे, जिल्हा उपाध्यक्ष माधवराव बनसोडे,पत्रकार राजेंद्र राऊत व पत्रकार बांधव आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसेनेच्या उमेदवारांच्या रॅलीला मोठा जनसागर



ठाणे : (समर्थ गांवकरी)

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ अंतर्गत शिवसेना-भाजपा-आर. पी.आय. महायुतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रभाग क्र. २७ चे उमेदवार शैलेश पाटील, स्नेहा पाटील, दिपाली भगत आणि ऍड. आदेश भगत या चारही उमेदवारांच्या महाप्रचार रॅलीला दिवा परिसरात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रविवारी सायंकाळी आयोजित केलेल्या या रॅलीदरम्यान उमेदवारांना आशीर्वाद देण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. रॅली मार्गावर ठिकठिकाणी नागरिकांनी फुलांची उधळण करत, घोषणा देत उमेदवारांचे स्वागत केले. महिला, युवक, ज्येष्ठ नागरिकांसह मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग दिसून आला. नागरिकांची गर्दी एवढी वाढली की काही काळासाठी मुख्य रस्ता वाहतुकीसाठी बंद झाल्याचे दिसून आले. प्रसंगी भगव्या रॅलीने परिसरात उत्साहाचे आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

"काम करत आलो... काम करत राहू..." या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. महायुतीच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ निघालेल्या या रॅलीमुळे दिवा शहरात निवडणुकीचे वातावरण तापले असून, नागरिकांचा वाढता पाठिंबा स्पष्टपणे दिसून आला. रॅली शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी चोख नियोजन केले होते. या महाप्रचार रॅलीने महायुतीच्या उमेदवारांना मोठे बळ दिल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू होती.

## जयंती उत्साहात संपन्न

जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खटकाळे येथे बाल सभेचे आयोजन सोमवार दिनांक 12.1.2026 रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खटकाळे येथे राजमाता जिजाबाई भोसले व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. बाल सभेचे संपूर्ण नियोजन इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी केले असून सभेच्या अध्यक्षस्थान प्रतीक्षा वायळ हिने स्वीकारले.सभेचे अध्यक्ष व उपस्थित यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्यावर आधारित आम्ही जिजाऊंच्या मुली या गीताचे गायन केले.प्राजक्ता भवारी,स्वराली मोडक, शर्वरी वायाळ,प्रतीक्षा वायाळ आरुषी मोरे,अर्पिता गागरे, ते तेजस्विनी गागरे,आराध्या साबळे या विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याविषयी सर्वांना माहिती सांगितली.

## माय माऊली केअर सेंटर, कात्रज येथे श्रीमद् भागवत सप्ताहाचे भव्य आयोजन!




पुणे : (समर्थ गांवकरी)

माय माऊली केअर सेंटर, कात्रज येथे भगवंताच्या कृपेने श्रीमद् भागवत सप्ताहाचे भक्तिमय आयोजन करण्यात आले आहे. या पवित्र कथा सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी सर्व भाविक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. हा श्रीमद् भागवत सप्ताह दि. १४ जानेवारी २०२६ ते २० जानेवारी २०२६ या कालावधीत होणार असून, दररोज दुपारी ३ ते ६ या वेळेत कथा श्रवणाचा कार्यक्रम संपन्न होईल.

या सप्ताहात प्रसिद्ध कथा प्रवक्ते श्री. शास्त्रीजी जीज्ञेशभाई जयेशभाई जोषी श्रीमद् भागवत कथेचे रसाळ निरूपण करणार आहेत.

कार्यक्रमाचे आधारस्तंभ व दीपप्रज्वलन मायेची माऊली – हक्काची सावली म्हणून ओळखले जाणारे मा. श्री. शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या शुभहस्ते होणार आहे. ते दानशूर, समाजरत्न, उद्योगरत्न व समाजभूषण असून एन. के. टी. चॅरिटेबल ट्रस्टचे प्रेसिडेंट आहेत.

या पवित्र सप्ताहास विविध क्षेत्रांतील मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. त्यामध्ये शासन, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, पत्रकारिता व पोलीस प्रशासनातील अनेक मान्यवर सहभागी होणार असून कार्यक्रमाची शोभा अधिक वाढणार आहे.

कथा प्रसंगांचे विशेष दिनांक:
१४/०१/२०२६ – श्रीमद् भागवत कथाप्रसंग प्रारंभ.
१५/०१/२०२६ – श्री कपिल जन्म.
१६/०१/२०२६ – श्री नरसिंह प्रागट्य.
१७/०१/२०२६ – श्री वामन जन्म, श्री राम जन्म, श्री कृष्ण जन्म.
१८/०१/२०२६ – श्री गोवर्धन लीला.
१९/०१/२०२६ – रुक्मिणी विवाह.
२०/०१/२०२६ – सुदामा चरित्र व समारोप.

कार्यक्रमाचे स्थळ: पुणे – माय माऊली केअर सेंटर, कात्रज–कोंढवा रोड, इंडियन ऑईल पेट्रोल पंपासमोर, हॉटेल महाबळेश्वरच्या मागे, कात्रज, पुणे–४६.

संपर्क : सहयोग व यजमानांसाठी संपर्क : मो. ९८२२०१२७०७ या भक्तिरसपूर्ण श्रीमद् भागवत सप्ताहात सहभागी होऊन अध्यात्मिक समाधान लाभ घ्यावे, असे आयोजकांनी आवर्जून कळविले आहे.

## भाऊसाहेब वाकचौरे यांना समाजभूषण पुरस्काराने गौरव!

नेवासा : (समर्थ गांवकरी)



शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे सन्माननीय व लोकप्रिय खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना समाजभूषण पुरस्कार जाहीर करून सन्मानित करण्यात आले. नेवासा तालुक्यातील वंजारवाडी येथे संत वामन भाऊ व संत भगवान बाबा प्रतिष्ठान, वंजारवाडी (ता. नेवासा) यांच्या वतीने आयोजित शिव महापुराण कथा कार्यक्रमात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, नेवासाचे महंत हरिभक्त परायण देविदासजी महाराज म्हस्के यांच्या शुभहस्ते खासदार वाकचौरे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. यावेळी महंत भागवताचार्य अतुल महाराज आदमाने, महंत मसलेकर महाराज, शिवकथा पुराण प्रवक्ते शास्त्री महाराज तसेच अहिल्यानगरचे निवासी जिल्हाधिकारी गीते आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास प्रतिष्ठानचे पदाधिकारी महादेव दराडे, नेवासा तालुक्यातील व संपूर्ण जिल्ह्यातील संत-महंत, ग्रामस्थ, शिवभक्तगण, तालुक्यातील सर्व सरपंच-उपसरपंच, विविध संस्थांचे चेअरमन व सर्व पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारताना खासदार भाऊसाहेब वाकचौरे म्हणाले की, "संपूर्ण मतदारसंघात खासदार निधी व इतर निधी विकासकामांसाठी पारदर्शकपणे खर्च करत आहे. प्रत्येक व्यक्तीचा, प्रत्येक गावाचा विकास हाच माझा ठाम दृष्टिकोन आहे. 'आपला माणूस—आपल्यासाठी' हे घोषवाक्य घेऊन गेली पंधरा वर्षे मी शिर्डी लोकसभा मतदारसंघात काम करत असून, पुढेही हीच सेवा अखंडपणे सुरू राहील."

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी खासदार वाकचौरे यांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

शिव महापुराण कथा व या धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमासाठी नेवासा तालुका व संपूर्ण जिल्ह्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती नोंदवली.

## स्पर्धांमध्ये यश

शिवनेरी : (समर्थ गांवकरी)

शिरोली बुद्रुक येथील रामकृष्ण मोरे इंग्लिश मिडियम च्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेमध्ये इयत्ता ९ वी . ची विद्यार्थिनी त्रिशा गणेश वायकर हिचा राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये निवड करण्यात आली . त्रिशा वायकर या विद्यार्थिनीने १५ वयोगटांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला . या शाळेची इयत्ता ९ वी विद्यार्थिनी रेशमा निलेश शेळके व आर्या प्रवीण गव्हाणे यांनी तिसरा क्रमांक पटकावला . किल्ले शिवनेरीच्या मातीतील या विद्यार्थिनींनी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेमध्ये रविवार, दिनांक ४ जानेवारी २०२६ हिवरे पिंपळे या ठिकाणी तालुका शिरूर, जिल्हा पुणे चाचणी कुस्ती स्पर्धेमध्ये उज्वल यश संपादन केले . याप्रसंगी संस्थेचे चेअरमन सत्यशील शेरकर म्हणाले की , सहकार तत्वातून उभा राहिलेली ही शैक्षणिक संस्था विशेषता शेतकरी व सर्वसामान्य पाल्यांसाठी आहे. या कुस्ती स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी संस्थेचे नाव उज्वल केले आहे.

## बावनबुरजी बचाव कृती समिती जिजाऊ चरणी नतमस्तक!

सिंदखेडराजा : (समर्थ गांवकरी)

बावनबुरजी बचाव कृती समितीच्या वतीने शिवरायांची सासुरवाडी करवंड येथे भव्य करवंड महोत्सवाचे आयोजन केले आहे. दरम्यान आज कृती समितीचे संकल्पक सुनील जवंजाळ पाटील व सहकार्यांनी जिजाऊ चरणी मातृतीर्थावर माथा टेकला. आई जिजाऊ महोत्सवाचे शिवधनुष्य पेलण्याचे बळ दे .. असे साकडे यावेळी सुनील जवंजाळ यांनी जिजाऊ चरणी घातले.

बुलढाणा जिल्ह्यामध्ये इतिहास घडला मात्र तो लिहिल्या गेला नाही. शिवरायांची सासरवाडी असणारे करवंड गाव त्यामुळे उपेक्षित राहिले. इंगळे घराण्यातील दोन मुली छत्रपती घराण्यात देण्यात आल्या होत्या. त्यातील एक गुणवंतबाई ह्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्नी होत्या. बावन बुरुज असल्याने या गावाला 52 बुरजी असे म्हटले गेले. आजही येथे भव्य राजवाडा, तटबंदी, मंदिर आहे.




मात्र हे सर्व इतिहासाचे अवशेष भग्न स्थितीमध्ये असून नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.हा ऐतिहासिक ठेवा जपला जावा यासाठी करवंड महोत्सवाची संकल्पना सुनील जवंजाळ पाटील यांनी मांडली. त्याला प्राचार्य अरविंद बापू देशमुख,गणेश निकम,आण्णासाहेब म्हणसणे यांनी प्रतिसाद दिला. सरदार घराण्यातील हरीरुद्र राजे सध्या करवंड निवासी आहेत. त्यांनी देखील या महोत्सवामध्ये हिरिरीने सहभाग घेतला आहे. त्यांच्या नेतृत्वात महोत्सव पुढे जात आहे. नुकतीच याबाबत एक महत्त्वपूर्ण बैठक करवंड या गावी पार पडली. यामध्ये समाजाच्या विविध घटकातील बहुसंख्य मान्यवर उपस्थित झाले होते. 12 जानेवारी रोजी जिजाऊ साहेबांची जयंती असल्याने आई जिजाऊ हे शिवधनुष्य पेलण्याचे बळ दे .. असे म्हणतात संकल्पक सुनील जवंजाळ पाटील व सहकाऱ्यांनी पूर्वसंध्येला मातृतिर्थावर जाऊन माथा टेकला. 15 एप्रिल रोजी करवंड येथे भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आहे.यावेळी प्रा दिलीपराव नाईकवाड, श्री विजयराव देशमुख, नारायणराव मिसाळ, एकनाथराव राजे जाधव, शिवाजीराव खरात, गणेशराव राजे जाधव, वाल्मीक सुराशे, मुकुंद दंडे आदी मान्यवर उपस्थित होते.



ठाणे : दिव्यातील प्रभाग २७ मधील अपक्ष उमेदवार सौ. सिमाताई गणेश भगत यांचा आपल्या प्रभागात प्रचाराचा जोर वाढताना दिसून येत असून दिवा शहरातील अनेक समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी मी कटीबद्ध असून महिलांची सुरक्षितता व प्रलंबित कामे मार्गी लावणार असल्याचे सौ सीमा भगत यांनी स्पष्ट केले आहे. वाढता प्रचारचा जोर पाहता त्या जनेतच्या विश्वासावर निवडून येतील असे त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले आहे. (फोटो - संतोष पडवळ)



ठाणे : दिव्यातील प्रभाग २८ मधील रिपब्लिकन बहुजन सेनेच्या उमेदवार उमेदवार सौ. शितल बनसोडे यांच्या प्रचारार्थ प्रसिद्ध लोकगायक आनंद शिंदे यांची उपस्थिती दर्शविली तर मतदारांना आपल्या गाण्यातून उमेदवारास संधी देण्याचे आवाहन केले. प्रसंगी रिपब्लिकन बहुजन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विजय घाटे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )

## पोखरी येथे ४३ लक्ष रुपयांचे विकासकामांचे भूमिपूजन संपन्न

पारनेर : (समर्थ गांवकरी)



आजवर पोखरी परिसर हा तालुक्यातील दुर्गम भाग म्हणून ओळखला जात होता. मात्र आमदार काशिनाथ दाते सरांच्या माध्यमातून या भागाला सातत्याने न्याय देण्याची भूमिका घेतलेली असून आपणा सर्वांच्या सहकार्याने आदरणीय सरांना तालुक्याचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. मिळालेल्या या संधीचे सोने करून उद्याच्या काळात विविध विकासकामे मार्गी लावली जातील आणि या विकासाच्या माध्यमातून पोखरी परिसराची 'तालुक्याचा दुर्गम भाग' अशी असलेली ओळख पूर्णतः पुसून टाकली जाईल, असे मत डॉ. प्रदीप दाते यांनी आमदार मा. काशिनाथ दाते सर यांच्या स्थानिक विकास निधीतून मोजे पोखरी येथिल विविध विकासकामांच्या भुमिपूजन व्यक्त केले. रविवार दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी पोखरी येथे एकूण ४३ लाख रुपये निधीच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन डॉ दाते यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यामध्ये श्री भैरवनाथ मंदिर ब्लॉक बसवणे (१० लाख रुपये), कुस्ती आखाडा ग्राउंड सुशोभीकरण (१५ लाख रुपये) पोखरी–पवळदरा/ निमदरी रस्ता मजबुतीकरण (१८ लाख रुपये) या कामांचा समावेश आहे. यावेळी माजी सरपंच परसराम शेलार, माजी चेअरमन महादू पवार पाटील, यादव फरतारे, रंगनाथ दाते, मा. व्हा. चेअरमन ज्ञानदेव पवार, डॉ. अविनाश शेलार, बाबाजी खैरे, पंडित खैरे, लहानू करंजेकर, कुंडलिक वाकळे, बाबुराव पवार, लक्ष्मण पवार, विष्णु खैरे, दारकू डेरे, चांगदेव वाकळे, दौलत आहेर, पोपट टेकुडे, सूर्यभान खैरे, सुभाष खैरे, प्रभू खैरे, ज्ञानदेव खैरे, तारमहमंद भाई, सोपान खैरे, सोमा दुधवडे, पांडुरंग दुधवडे, लक्ष्मण शिंदे, अशोक खैरे, बाळशिराम शिंदे, निलेश पवार, विकास शिवले, दत्ता शिंदे, पप्पू करंजेकर, माजी उपसरपंच नामदेव करंजेकर, दत्ता वाकळे, गणेश खैरे, शिवम पवार, सोपान शेलार, नवनाथ आहेर, सागर काशिद, शुभम शिंदे, ओंकार शिंदे, सार्थक पवार, अभि पवार, यश डेरे, दत्तू दुधवडे, नवनाथ दुधवडे, महादू दुधवडे, पोपट भोसले, भाऊ मधे, चैतन्य आग्रे, आनंद गांधी, महेश खैरे, विठ्ठल करंजेकर, कृष्णा खैरे, सर्जेराव शिंदे, सुभाष शिंदे, जगन्नाथ शिंदे, संदेश शिंदे, शांताराम आहेर, विजय दरेकर आदी मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते पोखरी गावासाठी मंजूर झालेली ही विकासकामे म्हणजे गावाच्या सर्वांगीण प्रगतीकडे टाकलेले ठोस पाऊल आहे. आमदार मा. काशिनाथ दाते सर यांच्या स्थानिक विकास निधीतून मिळालेल्या निधीमुळे मंदिर परिसर, स्वच्छतेसाठी आवश्यक सुविधा तसेच रस्त्यांची मजबुतीकरणाची कामे मार्गी लागली आहेत. यामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सोय-सुविधा वाढणार असून गावाचा विकास वेगाने होईल. विकासकामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी सर्वांनी सहकार्य करणे गरजेचे आहे. शासनाच्या विकासात्मक धोरणांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील. गावाच्या उज्वल भविष्यासाठी सर्वांच्या एकत्रित सहभागातूनच खरा विकास साध्य होऊ शकतो.

यापूर्वी आमदार मा. काशिनाथ दाते यांनी पोखरी व परिसरात राबविलेल्या विविध विकासकामांमुळे नागरिकांच्या मूलभूत सुविधा अधिक सक्षम झाल्या आहेत. रस्ते, पाणीपुरवठा व सार्वजनिक सोयी-सुविधांच्या कामांमुळे दैनंदिन जीवनात मोठी सुधारणा झाल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे आमदार दाते यांच्या कार्यपद्धतीबाबत स्थानिक नागरिकांनी समाधान व विश्वास व्यक्त केला.

# सांस्कृतिक परंपरा जपणारी म्हसा जत्रा

## ग्रामीण संस्कृतीचे दर्शन, अर्थकारणाचा संगम, करोडोंची उलाढाल

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठी मुरबाड तालुक्यातील म्हसा गावची 'म्हसा जत्रा' प्रसिद्ध समजली जात असून ,सद्या म्हसा जंत्रेत गर्दीला उधाण आले असून महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचा एक मोठा उत्सव, जिथे व्यापार, श्रद्धा आणि संस्कृती यांचा मेळ साधला जात असून ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, मुंबई, पालघर यांसारख्या जिल्ह्यांतून तसेच शेजारच्या राज्यांमधूनही लाखो भाविक आणि व्यापारी म्हसा जत्रेत दाखल झाले आहेत. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील म्हसा गावात खांबलिंगेश्वर (म्हसोबा) देवाच्या नावाने ही जत्रा भरते. दरवर्षी पौष पौर्णिमेला (जानेवारी महिन्यात) या यात्रेला सुरुवात होते. साधारणपणे १५ ते २० दिवस ही जत्रा सुरू असते. तर सद्या जत्रेसाठी येणाऱ्या भाविकांच्या लांबच, लांब रांगा पाहायला मिळत आहेत. तर दोनशे वर्षांहून अधिककाळ पारंपरिक स्वरूपात सांस्कृतिक परंपरा जपणारी म्हसा जत्रा असून, ग्रामीण संस्कृतीचे दर्शन, अर्थकारणाचा संगम, करोडोंची उलाढाल म्हसा जत्रेतून पाहायला मिळत आहे. तर अनेक युट्यबर म्हसा जत्रेत दाखल झाले असून,सांस्कृतिक परंपरा जपणारी म्हसा जत्रेचे अनेक व्हिडिओ सद्या सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहेत. म्हसा परिसरात शेतात,माळरानावर चुलीवरचे पारंपरिक पद्धतीने रात्रीचे जेवण करतांना भाविक दिसून येत आहेत. ही यात्रा ग्रामीण संस्कृती, श्रद्धा आणि अर्थकारणाचा संगम आहे, जिथे करोडोंची उलाढाल होत असते. म्हसा जत्रेत य घोंगड्या, ब्लँकेट, चादरी, चिनी मातीची बैल जोडी, खेळणी, मिठाई, खाजा, पेढे आणि इतर अनेक वस्तूंची दुकाने असतात. सद्या हिवाळ्याचे दिवस असून, मोठ्या प्रमाणात घोंगड्या, ब्लँकेट,स्वेटर, चादरींची मोठ्या प्रमाणात मागणी दिसून येत असून, नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. तर याच साहित्यासाठी म्हसा जत्रा प्रसिद्ध समजली जाते. शिवाय बांबूच्या टोपल्या, झाडाच्या खोडापासून तयार केलेला उखळ, कोयते, कुदळ, विळे असं शेतीला उपयोगी पडणाऱ्या साहित्याची मोठ्या प्रमाणात शेतकरी खरेदी करताना दिसत आहे.म्हशाच्या जत्रेत मिळणारे हातोळी खाजा, गुलाबजामुन हे गोड पदार्थही मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध असून, गोड पदार्थ खाण्यासाठी देखिल नागरिकांची गर्दी दिसून येत आहे. दोनशे वर्षाहून अधिक ही म्हसा यात्रा आजपर्यंत निरंतर चाललेली आहे असे ज्येष्ठ नागरिकांचे म्हणणे आहे. यात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे शेकडो वर्षांपासून चालत आलेला बैल बाजार, जिथे महाराष्ट्रासह इतर राज्यांमधूनही लाखोंच्या संख्येने शेतकरी बैल खरेदी-विक्रीसाठी येतात, तसेच विविध वस्तूंची दुकाने, खेळणी आणि मनोरंजनाचे साहित्य खरेदीसाठी नागरिकांची गर्दी दिसून येत आहे. म्हसा जत्रा या काळात मोठ्या प्रमाणावर होणारी भाविकांची गर्दी आणि वाढत्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने वाहतूक नियंत्रणासाठी विशेष उपायोजना राबविण्यात येत आहेत.



# पश्चिम महाराष्ट्र व कोकणी रहिवास्यांचे मेळावे संपन्न

- दिवा शहरातील कोकणी व पश्चिम महाराष्ट्रातील रहीवास्यांची साथ विकास कामांना

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



दिव्यात पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, अहिल्यानगर जिल्ह्यातील दिवा शहरातील रहिवासी व ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिधुदुर्ग जिल्ह्यातील राहणारे कोकणवासी रहिवासी यांचे दोन्हीही वेगवेगळे मेळावे दिवा शहरातील अवधूत हॉल मध्ये मोठ्या संख्येच्या उपस्थित पार पडले. परिणामी सदर भागातील दिवा शहरात वास्तव्यास असलेले दिवेकर रहिवासी रविवारची सुट्टी असल्याने मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेल्या दहा पंधरा वर्षातील दिवा शहराचा झालेला कायापालट, पूर्वी व आत्ताचा दिवा, याचे सर्वस्व श्रेय देण्यासाठी मोठ्या संख्येची उपस्थिती दिसून आली. सदर दोन्हीही मेळाव्यात दिव्याची साथ विकास कामांना थोडक्यात धनुष्यबाणाला अश्या पद्धतीने घोषणा देत शिंदेच्या शिवसेनेला रहिवास्यांनी आपला पाठिंबा दर्शवीला. प्रसंगी उपरोक्त जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी व सभासद अवधूत हॉल मध्ये मोठ्या संख्येने व उत्साहात सहभागी झाले होते. सदर मेळाव्यात दिव्याची साथ विकास कामांना थोडक्यात धनुष्यबाणाला अश्या पद्धतीने घोषणा देत शिंदेच्या शिवसेनेला पाठिंबा देण्यात आला. प्रसंगी उपरोक्त जिल्ह्यातील अनेक पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेचे शहरप्रमुख व उमेदवार रमाकांत मढवी तसेच उमेदवार दीपक जाधव, दर्शना म्हात्रे व साक्षी मढवी यांचे मोठ्या उत्साहात स्वागत व अभिनंदन केले. प्रसंगी कोकणासह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील लोकांशी माझी जोडलेली नाळ व जुन्या आठवनींना उजाळा देत सदर रहिवस्यांनी केलेल्या कामे व मागणीवर सकारात्मकता दाखवत शहरप्रमुख रमाकांत मढवी यांनी रहिवास्यांचे आभार मानले.

# स्वारातीम विद्यापीठात जिजाऊ मॉ साहेब व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आज सोमवार, दि.१२ जानेवारी, २०२६ रोजी जिजाऊ मॉ साहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी जिजाऊ मॉ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या कार्यक्रमास विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, वित्त व लेखाधिकारी डॉ. पराग भालचंद्र, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, आयक्यूएसीचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, तसेच जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी जिजाऊ मॉ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



# जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**नांदेड: (समर्थ गांवकरी)**

नांदेड जिल्हा परिषदेत आज राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांच्या हस्ते रातमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांच्यासह जिल्हा परिषदेतील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नूतन ग्रामपंचायत इमारतीचे आमदार नितीन पवार यांच्या शुभहस्ते भव्य उद्घाटन

**ओतूर (ता.कळवण) (समर्थ गांवकरी)**

ओतूर गावातील नूतन ग्रामपंचायत कार्यालय इमारतीचे भव्य उद्घाटन कळवण–सुरगाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार नितीन भाऊ पवार यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. ग्रामविकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरलेल्या या सोहळ्यास ग्रामस्थांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.यां उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार नितीन पवार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ओतूर धरणांच्या कामांकडे आता विशेष लक्ष देऊन ती कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण केली जातील. ओतूर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. रस्ते, पाणीपुरवठा योजना यांसह मूलभूत सुविधांसाठी आपण कुठेही कमी पडणार नाही, असा ठाम विश्वास त्यांनी दिला.



ओतूर गावाचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी ओतूर धरणांची कामे सर्वोच्च प्राधान्यक्रमावर असून, शेतकरी, नागरिक आणि येणाऱ्या पिढ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ही कामे लवकरात लवकर पूर्ण केली जातील, असेही आमदार नितीन भाऊ पवार यांनी ठळकपणे नमूद केले.

या उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान मराठा विद्या प्रसार संस्थेचे संचालक तथा मा, बांधकाम सभापती रवींद्र बाबा देवरे यांनी भूषविले. कार्यक्रमात बोलताना डॉ. पंकज मेने यांनी मुळाणे–वणी बारी रस्त्याच्या खोलीकरणाचा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करत या कामाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली. तर रमेश दशपुते यांनी पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या धोडप किल्ल्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी आमदार नितीन पवार यांच्याकडे केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाबाण पठाण यांनी केले. सूत्रसंचालन देवा भुजाडे यांनी केले.

यावेळी त्यांनी गावाच्या विकासाशी संबंधित विविध प्रश्न व विषयांवर उपस्थित मान्यवरांचे लक्ष वेधले.नूतन ग्रामपंचायत इमारतीमुळे ग्रामस्थांना अधिक सक्षम, पारदर्शक व सुलभ प्रशासकीय सेवा मिळणार असून, ओतूर गावाच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.या कार्यक्रमास सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, गावातील ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधी, तरुण वर्ग, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी विखे पाटील यांना दिले निवेदन

- जिल्हा बँकेचे संचालक अमोल जगन्नाथ राळेभात यांनी निवेदनाद्वारे केली सरसकट कर्जमाफीची मागणी

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**



शासनाने कर्जमाफी करण्यासाठी समिती गठीत केली असून समितीचा अहवाल आल्यानंतर कर्जमाफी होणार असल्याचे समजते. यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ व महात्मा जोतिराम फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ या दोन्ही कर्जमाफीवेळी थकीत कर्जदार व नियमित कर्ज परतफेड करणारे सभासद यांच्यात भेदभाव करून नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या सभासदांना प्रोत्साहन म्हणून तुटपुंजी रक्कम देण्यात आलेली होती. जामखेड तालुक्यामध्ये साधारणत: १०३९८ शेतकऱ्यांकडे ९९ कोटी ९५ लाख थकबाकी असून ११३४१ नियमितपणे कर्ज परतफेड करणारे शेतकरी आहेत. नियमितपणे कर्ज परतफेड करणाऱ्या सभासदांपैकी अनेक शेतकरी हे उसनवारी घेऊन, सोनं गहाण ठेवून व इतर मार्गाने काहीतरी उलाढाल करून दरवर्षी मार्चपूर्वी नियमितपणे कर्जाचा भरणा करत आहेत. परंतु शासन दरवेळेस कर्जमाफी करताना अत्यंत तुटपुंजी रक्कम प्रोत्साहन म्हणून देत आहे. यामुळे नियमितपणे कर्जाचा भरणा करणारे शेतकरी यांची मोठ्या प्रमाणात नाराजी वाढत असून नियमित कर्ज भरावे कि नाही असा नाराजीचा सूर त्यांच्याकडून व्यक्त होत असल्याची भावना अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक अमोल जगन्नाथ राळेभात साहेब यांनी व्यक्त केली. त्याचप्रमाणे यावर्षी अतिवृष्टीने खूप मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे त्यामुळे शासनाने थकीत कर्जदार व नियमित कर्जदार शेतकरी असा भेदभाव न करता सर्व शेतकऱ्यांना समान न्याय देण्यासाठी सरसकट कर्जमाफी/ प्रोत्साहन योजना जाहीर करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी अशी मागणी जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास) मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्याकडे अमोल जगन्नाथ राळेभात साहेब यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदन देताना मार्केट कमिटीचे माजी सभापती/विद्यमान संचालक सुधीर दादा राळेभात, संचालक कैलास वराट सर, संचालक विठ्ठल चव्हाण तसेच विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांचे चेअरमन किसन बापू ढवळे, अंकुश कोल्हे, महादेव डिसले, भारत काकडे, शहाजी मिसाळ, बबन ढवळे, डॉ.अविनाश पवार, महादेव डूचे सर, जयवंता सावंत, राजू बारवकर याशिवाय काशिनाथ मते, दादासाहेब पवार, कैलास वाळुंजकर, हरिदास काळदाते व इतर उपस्थित होते.

# पिंपळेश्वर पायी कावडचे स्वागत

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील १४ नंबर या ठिकाणी पिंपळेश्वर देवस्थान ट्रस्ट पिंपळवंडी या सर्व वारकऱ्यांचे गेले बारा वर्ष चहापान, नाष्टा, शुद्ध पाणी आयोजन श्री स्वामी समर्थ व्यापारी बचत गट १४ नंबर नेहमी सेवा करत आहे. पिंपळेश्वर मंदिर पिंपळवंडी ते भीमाशंकर असा प्रवास या ठिकाणी श्री स्वामी समर्थ व्यापारी बचत गट यांच्यावतीने सर्व वारकरी व भाविकांना पावभाजी नाष्टा करण्यात आला . सर्व वारकऱ्यांचे या ठिकाणी भव्य स्वागत फटाके वाजवून करण्यात आले .यावेळी उपस्थित माजी कृ.ऊ बाजार समिती सभापती रघुनाथ लेंडे , शिवसेना तालुकाप्रमुख माऊली खंडागळे , उप तालुका प्रमुख मंगेश काकडे , लोकनुक्त सरपंच मेघा काकडे , ग्रामपंचायत सदस्य सतीश काकडे व ऋषिकेश भोर सामाजिक कार्यकर्ते पि के कोकाटे , तंटामुक्ती अध्यक्ष तानाजी वाळुंज , प्रकाश नेहरकर , चेअरमन संतोष नेहरकर , सदस्य सत्यवान काकडे , कावड समिती अध्यक्ष वंसत वाघ , विकास काकडे राजु काकडे सुनील फुलसुंदर आदी मान्यवर उपस्थित होते.

# त्रुटी पूर्तता शाळांच्या अनुदानाचा प्रश्न झाला गंभीर

- शासन आदेश असूनही लाभ नाही
- शिक्षक–कर्मचाऱ्यांत तीव्र असंतोष

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

### शिक्षण व्यवस्थेवर गंभीर परिणाम

तज्ज्ञांचे मत आहे की, त्रुटी पूर्तता शाळा बंद पडल्यास त्याचा सर्वाधिक फटका ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांना बसणार आहे. शासनाने वेळेत निर्णय घेतला नाही, तर शिक्षणातील असमानता वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्रातील त्रुटी पूर्तता शाळांवरील अन्याय पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, शासन निर्णय असूनही अनेक शाळांना अद्याप अनुदानापासून वंचित ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे. या संदर्भात उच्चस्तरीय बैठक घेण्याची मागणी आता अधिक तीव्र झाली आहे. ग्रामीण व शैक्षणिकदृष्ट्या मागास भागात शिक्षणाची पोकळी भरून काढण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या अंशतः विना अनुदानित त्रुटी पूर्तता शाळांनी गेल्या अनेक वर्षांपासून शासनाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली आहे. मात्र, प्रत्यक्षात या शाळांना न्याय मिळत नसल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. १४ ऑक्टोबर २०२४ चा शासन आदेशही कागदावरच ३० दिवसांत त्रुटी पूर्तता केलेल्या शाळांना १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेशानुसार ৪मान्य वेतनश्रेणीतील टप्पा वाढ व अनुदान देणे अपेक्षित होते. तथापि, आजही अनेक पात्र शाळांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही. परिणामी शिक्षकांचे आर्थिक नुकसान होत असून शाळांचे व्यवस्थापन डबघाईस आले आहे. विशेष म्हणजे, शेवटच्या वर्गाच्या पटसंख्येच्या अटीमुळे सन २०२२-२३ मध्ये अनुदानापासून वंचित राहिलेल्या शाळांनाही अजूनही न्याय मिळालेला नाही. सन २०२३-२४ किंवा २०२४-२५ मधील वाढीव पटसंख्या ग्राह्य धरून अनुदान द्यावे, अशी रास्त मागणी असूनही शिक्षण विभागाकडून ठोस निर्णय झालेला नाही. या प्रश्नांसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वारंवार निवेदने दिली, पाठपुरावा केला, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे आता संबंधित मंत्री, वरिष्ठ अधिकारी व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसह तातडीने बैठक घेण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# पत्रकार हे घेणारे नाही तर देणारे आहेत : डॉ . विश्वासराव आरोटे

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने निघोज येथे पत्रकार दिन उत्साहात साजरा

याप्रसंगी राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे यांचा मुलगा चि. स्वामी याने शालेय स्तरावरील परीक्षेत जिल्हा परिषदेच्या पिंपरी जलसेन शाळेत प्रथम क्रमांक मिळविल्याने त्याचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



समाजासाठी आपल्या लेखनीच्या माध्यमातून अहोरात्र काम करणारे पत्रकार हे समाजाला देणारे असून घेणारे नाहीत , असे स्पष्ट प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ . विश्वासराव आरोटे यांनी केले .

निघोज येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने मळगंगा ग्रामविकास ट्रस्टच्या सभागृहात पत्रकार दिनाचे औचित्य साधत पत्रकार गुणगौरव आणि सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला , अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे हे होते. प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर आणि माता मळगंगा यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ .आरोटे पुढे म्हणाले की, पारनेरच्या पत्रकारितेला विशिष्ट धार आहे , त्यांचे काम ही उत्कृष्ठ आहे , असे गौरवोद्गार काढत , पत्रकारितेचे महत्व विशद करताना ते पुढे म्हणाले की , देशातील न्यायाधीशांवर हल्ले झाले, तेव्हा त्यांना ही पत्रकारांकडेच यावे लागले. पत्रकारांचा मोठेपणा सांगतानाच, चुकीच्या बातम्या देऊ नका, राजकारणी मंडळींच्या आती, जवळ जाऊ नका. कारण ते तुम्हाला ग्राह्य धरतील, त्यामुळे पत्रकारांनी कुणाचेही प्यादे होऊ नका. सोशल मीडिया कितीही पुढे गेली तरी, आज समाजाचा वृत्तपत्र वाचनावरच विश्वास आहे. पारनेरचा पत्रकार देशात कुठेही गेला , तरी त्याला त्या ठिकाणी मदत मिळाली पाहिजे, असे संघटन आम्ही केलेले आहे. प्रसंगी सुखदुःखात आम्ही धावून जातो. संवाद यात्रेत नागपूर पासून मुंबई पर्यंत आम्ही सर्व पत्रकारांना एकत्रित केले. २२ मागण्या मंत्रालयात सादर केल्या. सरकारला वज्र मूठ दाखविली. त्यामुळे संघटनेला बळकटी आली. कोरोना काळात दुर्दैवाने निधन झालेल्या पत्रकारांना आम्ही मदत केली.

आम्ही देणारे आहोत , घेणारे नाही . पदे येतील , जातील , पण समाजासाठी तळमळीने काम करणाऱ्या पत्रकारांना संघटना कधीही विसरणार नाही, त्यांना उभारी देण्याचे काम आमची संघटना करते. कुणाचेही जीवन उद्ध्वस्त होणार नाही , याची काळजी पत्रकारांनी घ्यावी . शिक्षकांप्रमाणे पत्रकार कधीही माजी होत नाही. निष्ठेने काम करा, असा महत्वपूर्ण सल्ला ही डॉ . आरोटे यांनी दिला .

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट चे कार्याध्यक्ष वसंतराव कवाद यांनीही पत्रकारांचा गुणगौरव करून, समाजा मध्ये परिवर्तन घडवण्याची ताकद पत्रकारांमध्ये आहे. श्री मळगंगा देवस्थान ट्रस्टचे कार्य लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी पत्रकारांनी केलेली मदत कदापिही विसरता येणार नाही. आज समाजामध्ये अनेक समस्या आहे.

समाज जागृतीसाठी पत्रकारांनी विशेष काम करावे. ट्रस्टच्या माध्यमातून आमचा प्रयत्न आहेच.पत्रकारांनी समाजाला एकत्र आणण्याचे काम करावे , असे ही कवाद म्हणाले . तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा सरचिटणीस आर एस कापसे यांनीही पत्रकारांच्या कार्याचा गौरव केला . राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे यांनी पत्रकारितेचे महत्व विशद करत , राज्य पत्रकार संघाच्या कार्याची माहिती अवगत करून दिली .

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य सुरेश खोसे पाटील यांनी प्रास्ताविक व सुत्रसंचालन करताना पत्रकार संघाचे महत्त्व विशद करत डॉ . आरोटे यांच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी संघाचे जिल्हा प्रसिद्ध प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे , ज्येष्ठ पत्रकार दत्ता उनवणे, मुकुंदराव निघोजकर, पत्रकार संघाच्या इलेक्ट्रॉनिक मीडिया सेल चे जिल्हा प्रमुख विनोद गायकवाड, संघाचे तालुका सचिव संतोष कोरडे , सहसचिव सोमनाथ गोपाळे , उपाध्यक्ष वसंत रांधवण , श्रीनिवास शिंदे , निघोज शहराध्यक्ष सचिन जाधव, अनिलराव चौधरी , दिपकराव वरखडे , विकास शेंडकर , संपत वैरागर, भगवान मंदिलकर , विजय रासकर, नितीन परंडवाल, सुनिल लोणकर , जयदीप कारखिले , आनंदा भुकन , सागर आतकर , रोहन उनवणे , व श्रीगोंदा येथील पत्रकार मेजर उल्हारे , कु . उल्हारे , बनसोडे , राऊत व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित पत्रकारांचा शाल , पेन , डायरी , मिठाई , घडयाळ , गुलाब पुष्प देत सन्मान करण्यात आला.

सेवानिवृत्त प्राचार्य रामचंद्र सुपेकर यांनी सर्वांचे आभार मानले. ज्ञानेश्वर माऊलींचे पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# भारतीय राज्यघटनेतील सामाजिक अभियांत्रिकीमुळे समतावादी समाज निर्माण झाला : डॉ. अभिजित पाटील

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्यांचा संच नसून ती भारतीय समाजाच्या पुनर्रचनेचा, परिवर्तनाचा आणि समतेकडे नेणाऱ्या प्रवासाचा जाहीरनामा आहे. भारतीय राज्यघटनेतील सामाजिक अभियांत्रिकी ही संकल्पना समाजातील विषमता दूर करून न्याय्य, समतावादी आणि बंधुभावावर आधारित समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आली आहे. सामाजिक अभियांत्रिकी म्हणजे समाजातील विविध घटकांमध्ये समतोल साधण्यासाठी कायदा व धोरणांचा जाणीवपूर्वक वापर करणे. भारतासारख्या जात, धर्म, भाषा, लिंग आणि आर्थिक विषमतेने ग्रस्त समाजात ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेची रचना करताना सामाजिक न्यायाला केंद्रस्थानी ठेवले व कायद्याला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन बनवले. असे मत शिव छत्रपती महाविद्यालयातील प्रा. डॉ. अभिजित पाटील यांनी व्यक्त केले. ओतूर येथील अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयात राष्ट्रीय युवक दिनानिमित्त दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित केलेल्या "भारतीय राज्यघटना व सामाजिक अभियांत्रिकी"* या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते.

कार्यशाळेचे दुसरे वक्ते डॉ. राजेंद्र आंबवणे म्हणाले "भारतीय राज्यघटना बंधुता, समता आणि न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडवण्याचा प्रयत्न करते. मात्र, सामाजिक अभियांत्रिकी ही केवळ राज्याची जबाबदारी नसून नागरिक म्हणून आपणही संविधानिक मूल्यांचे पालन करणे तितकेच आवश्यक आहे. कायदे असले तरी मानसिकता बदलल्या शिवाय सामाजिक परिवर्तन पूर्ण होऊ शकत नाही".कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून डॉ. रमेश शिरसाट म्हणाले "भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार हे सामाजिक अभियांत्रिकीचे महत्त्वाचे साधन आहेत. कायद्यापुढे समानता, अस्पृश्यतेचा अंत, धर्मस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांसारखे अधिकार समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देतात. विशेषतः कलम १५ आणि १७ हे सामाजिक विषमता नष्ट करण्याच्या दृष्टीने अत्यंत क्रांतिकारक ठरले आहेत." उपप्राचार्य डॉ. कल्याण सोनावणे यांनी अध्यक्ष व प्रमुख वक्त्यांचे स्वागत केले, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. नंदकिशोर उगले यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक करून कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. सूत्रसंचालन डॉ. निलेश काळे व प्रा. सुवर्णा डुंबरे यांनी केले तर आभार डॉ. विनायक कुंडलिक यांनी मानले.

कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. कुणाल वानखेडे, डॉ. वसंत गावडे, प्रा. जितेंद्र घोडके, प्रा. डॉ. ए. टी. पाडवी, डॉ. राजेश रसाळ, डॉ. किशोर काळदंते, प्रा. स्वप्नाली दांगट, प्रा. स्वप्नाली साबळे, प्रा. अनिता डुंबरे, प्रा. मनोज देशमुख, डॉ. धनंजय गडगे आदी उपस्थित होते.

# या नवीन वर्षात अनन्या पांडेने साध्या सवयींना दिले प्राधान्य

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**



अनन्या पांडेने २०२६ मध्ये पाऊल ठेवत स्वतःला प्रामाणिक ठेवले आहे. एका नव्या इंस्टाग्राम रीलमध्ये, अभिनेत्री आरशासमोर एक खुला क्षण शेअर करताना दिसते, जिथे ती स्वतःशी बोलत आहे आणि नवीन वर्षाच्या संकल्पांबरोबर येणाऱ्या परिचित तणावावर मार्गदर्शन करते.

वेळ किती लवकर निघून जातो आणि 'नवीन वर्ष, नवीन मी' या कल्पनेसोबत अनेकदा चिंता कशी येते, हे मान्य करत अनन्याने अधिक वास्तववादी दृष्टिकोन निवडला आहे – अशक्य मानकांचा पाठलाग करण्याऐवजी लहान, शाश्वत सवयींवर लक्ष केंद्रित करणे. चांगली झोप घेणे आणि पुरेसे पाणी पिण्यापासून ते नियमित व्यायाम करण्यापर्यंत, तिचा संदेश परिपूर्णतेपेक्षा सातत्यावर अधिक भर देतो. ती तिच्या सकाळच्या दिनचर्येतील एका साध्या सवयीवरही प्रकाश टाकते: दिवसाची सुरुवात मूठभर कॅलिफोर्निया बदामांनी करणे. ऊर्जेचा नैसर्गिक स्रोत असलेले बदाम तिला दिवसभरासाठी ऊर्जा देतात, तर त्यांमधील आरोग्यदायी चरबी आणि व्हिटॅमिन ई त्वचेच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकणारे वृद्धत्वविरोधी गुणधर्म देतात, असे दिसून आले आहे. सोपे आणि आत्मसात करता येण्याजोगे, रीलचा शेवट एका उबदार, वैयक्तिक संदेशावर होतो; अनन्या पांडे सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत पुढील वर्ष अधिक दयाळू व विचारपूर्वक घडावे, असा मूड तयार करते.

# पुण्यात प्रथमच येत आहे पॉ पेट्रोल

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




जगभरात प्रसिद्ध आणि लहान मुलांमध्ये लोकप्रिय असलेला प्री-स्कूल शो (पी ए डब्ल्यू) पॉ पेट्रोल आता प्रथमच पुण्यात येत आहे. हा खास कार्यक्रम फिनिक्स मार्केटसिटी पुणे येथील लिबर्टी स्क्वेअर येथे 9 जानेवारी ते 8 फेब्रुवारी 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. यावेळी लिबर्टी स्क्वेअर हे ठिकाण ॲडव्हेंचर बे थीमवर सजवले जाणार आहे. मुले आणि कुटुंब येथे मजेदार आणि इंटरॅक्टिव्ह अनुभवाचा आनंद घेऊ शकतील. हा उपक्रम भारतात जिओस्टारकडून सादर केला जात आहे.

हा खास कार्यक्रम लहान मुलांना त्यांच्या आवडत्या पप्पी हिरोंच्या जगात घेऊन जाणार असून, विविध ॲक्टिव्हिटी झोनमध्ये आयोजित केलेल्या मजेदार आणि थीमवर आधारित मिशन्समध्ये सहभागी होण्याची संधी देणार आहे.

प्रवेश करताच प्रत्येक मुलाला पॉ पेट्रोल पासपोर्ट आणि एक ॲक्टिव्हिटी बँड दिला जाईल. प्रत्येक ॲक्टिव्हिटी पूर्ण केल्यानंतर त्यांच्या पासपोर्टवर शिक्का मारला जाईल, ज्यामुळे ते मिशन पूर्ण करण्याच्या अधिक जवळ जातील. सर्व ॲक्टिव्हिटीज पूर्ण केल्यानंतर मुलांना कम्प्लीशन सर्टिफिकेट आणि ऑफिशियल पॉ पेट्रोल गिफ्ट्स दिली जातील, ज्यामुळे हा अनुभव मुलांसाठी अधिक मजेदार, खास आणि अविस्मरणीय ठरेल.

**कार्यक्रमातील खास ॲक्टिव्हिटीज**

- चेससोबत केस सॉल्व्ह करा
- रबलचे कन्स्ट्रक्शन सेंटर
- मार्शलसोबत फायर फ्लाइट
- स्कायसोबत उड्डाणाचा अनुभव
- इमर्सिव्ह व्हीआर कार रेस
- आर्ट्स अँड क्राफ्ट्स झोन
- पॉ पेट्रोल स्क्रीनिंग एरिया
- पप कॅरेक्टर्ससोबत भेट आणि संवाद
- प्रोफेशनल फोटोग्राफी झोन
- अधिकृत पॉ पेट्रोल भेटवस्तू

पॉ पेट्रोल हा शो त्याच्या मनोरंजक कथाकथनासाठी ओळखला जातो. तसेच मुलांना टीमवर्क, धैर्य आणि समस्या सोडवण्याचे महत्त्व शिकवतो. हा लाईव्ह अनुभव मुलांसाठी सुरक्षित, आनंददायी आणि शिकवण देणारा आहे. येथे मुले खेळू शकतात, नवीन गोष्टी शिकू शकतात आणि आपल्या कुटुंबासोबत सुंदर व कायम लक्षात राहतील अशा आठवणी तयार करू शकतात.

# जयंतीनिमित्त अभिवादन

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रमाता जिजाऊ तथा स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी कॉपर्निकस मार्गावरील महाराष्ट्र सदनाच्या सभागृहात त्यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे,सहाकय निवासी आयुक्त स्मिता शेलार, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, सहायक लेखा अधिकारी निलेश केदारे, उपअभियंता किरण चौधरी तसेच महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. यावेळी व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांनी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या मातृत्वपूर्ण कार्याचा व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा आणि राष्ट्रनिर्माणातील त्यांच्या प्रेरणादायी योगदानाचा सर्वांना परिचय करून दिला.

# वाहन सेवा सुविधा वाढवण्यासाठी सामंजस्य करार

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



भारतातील आघाडीची ऊर्जा कंपनी इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (आयओसीएल) आणि देशातील आघाडीची वाहन निर्माता मारुती सुझुकी इंडिया लिमिटेड (एमएसआयएल) यांनी ग्राहकांच्या सोयीसुविधा वाढवण्यासाठी एक सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. या करारानुसार, देशभरातील काही निवडक इंडियन ऑइल इंधन पंपांवर मारुती सुझुकी सेवा सुविधा उभारल्या जातील. हा सहयोग इंडियन ऑइलच्या मोठ्या देशव्यापी नेटवर्कचा उपयोग करून विविध मारुती सुझुकी सेवा सुविधा स्थापन करण्यासाठी केला जात आहे. या एकत्रिकरणामुळे ग्राहकांना त्यांच्या मारुती सुझुकी कारसाठी नियोजित नियमित देखभाल आणि किरकोळ दुरुस्ती सेवा त्याच ठिकाणी उपलब्ध होईल, जिथे ते इंधन भरतात, ज्यामुळे त्यांचा अनुभव अधिक सोपा आणि सुलभ होईल. इंडियन ऑइलच्या विस्तृत रिटेल नेटवर्कमुळे मारुती सुझुकीच्या 5,780 हून अधिक सेवा केंद्रांना आणखी मजबूत केले जाईल. इंधन स्टेशनवर अधिकृत सेवा उपलब्ध करून देऊन, दोन्ही कंपन्या ग्राहकांना "वन-स्टॉप" समाधान देण्याचा उद्देश ठेवतात, ज्यामुळे कारच्या मालकीच्या संपूर्ण प्रवासात सोयीसुविधा आणि मनःशांती मिळेल. श्री सौमित्र पी. श्रीवास्तव, डायरेक्टर (मार्केटिंग), इंडियन ऑइल म्हणाले: "ग्राहकांना इंधन पंपावर अधिक चांगली सेवा देण्यासाठी इंडियन ऑइल मूल्यवर्धित सेवा देण्यास कटिबद्ध आहे. भारतभर 41,000 हून अधिक इंधनपंप असल्याने, आम्ही ग्राहकांच्या जवळ आवश्यक सेवा आणू शकतो. मारुती सुझुकीसोबत भागीदारी करून, आम्ही आमच्या ऊर्जा सेवांबरोबर जागतिक दर्जाची वाहन देखभाल सेवा एकत्र आणत आहोत." श्री राम सुरेश अकेला, एग्जीक्यूटिव ऑफिसर (सर्व्हिस), मारुती सुझुकी इंडिया लिमिटेड म्हणाले: "ग्राहकांसाठी कार सर्व्हिसिंग शक्य तितकी सोपी आणि सोयीस्कर करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. भारतातील सर्वात विश्वासार्ह महा-रत्न कंपन्यांपैकी एक असलेल्या इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडसोबत भागीदारी करून, आम्ही त्यांच्या विस्तृत नेटवर्कचा लाभ घेऊन आमची विक्रीनंतरची सेवा ग्राहकांच्या नेहमीच्या ठिकाणी उपलब्ध करून देऊ. हा सहयोग मोबिलिटी आणि ऊर्जा क्षेत्राला एकत्र आणण्याच्या दिशेने आणि उत्कृष्ट ग्राहक सेवा अनुभव देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

# 'सावनी अनप्लग्ड अँड बियाँड'च्या पहिल्याच लाईव शो ला दमदार प्रतिसाद

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



आजवर हॉलिवूड, बॉलिवूड सिंगर च्या कॉन्सर्टला प्रेक्षकांनी पसंती दर्शवलेली पाहायला मिळाली आहे. पण आता एका मराठी गायिकेच्या कॉन्सर्टलाही चाहत्यांनी भरभरून दाद दिलेली पाहायला मिळतेय. राष्ट्रीय पुरस्कार विजेती गायिका सावनी रवींद्र हिच्या "सावनी अनप्लग्ड अँड बियाँड" या लाईव्ह शोला प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद दर्शवला. पुण्यातील रामकृष्ण मोरे सभागृहात पहिला कॉन्सर्ट मोठ्या दिमाखात पार पडला. त्यावेळी संपूर्ण सभागृहात मोठ्या संख्येने चाहत्यांची उपस्थिती पाहायला मिळाली.

आजवर सावनीने विविध भाषांमध्ये गाणी गायली आहेत मात्र या लाईव्ह शोमुळे ती एका वेगळ्या अंदाजात प्रेक्षकांसमोर आली. भव्य सेट, उत्तम वाद्यवृंद, कोरस सिंगर आणि डान्सर यांच्या तोडीस तोड नृत्य करत सावनीने दमदार परफॉर्मन्स दिला.

मराठी गायनविश्वात नृत्य आणि LIVE गायन हा एकत्रित प्रयोग

सावनी रविंद्र हिने यशस्वी रित्या करून दाखवला...प्रेक्षकांनी देखील तिच्या या नव्या अवताराचे खूप कौतुक करत दखल घेतली.

एकूणच या यशाबाबत बोलताना सावनी म्हणाली, "2017 मध्येच मी सावनी Unplugged या यूट्यब series च्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीस आले..

त्यानंतर त्याच संकल्पनेचा लाईव्ह शो देखील घेऊन आले... प्रदीर्घ कालावधीनंतर हा कार्यक्रम पुन्हा रसिकांसमोर आणताना काहीतरी नवीन करण्याचा माझा विचार होता. म्हणून मी 'सावनी Unplugged अँड बियाँड' हा सीक्वल नवीन वर्षाच्या निमित्ताने रसिकांसाठी सुरेल भेट म्हणुन घेउन आले. नेहमीच प्रेक्षकांना काहीतरी नवीन देण्याचा माझा प्रयत्न असतो आणि नृत्य करत स्टेजवर लाईव्ह गाणी गाणं हा अर्थातच माझ्यासाठी चॅलेंजिंग टास्क होता. माझ्या या पाहिल्याच प्रयत्नाला चाहत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्यात अत्यंत भाग्याची गोष्ट म्हणजे, या पहिल्याच प्रयोगाला माझे गुरु आदरणीय भावगंधर्व पंडित हृदयनाथजी मंगेशकर यांची उपस्थिती होती. दहा वर्षांची असल्यापासून मी त्यांच्या मार्गदर्शनाखाली गायन सादर करत आहे.

आणि पहिल्याच प्रयोगाला त्यांची उपस्थिती, त्यांचे आशीर्वाद आणि त्यांचे कौतुकाचे बोल याचबरोबर माझ्या पाठीवर मिळालेली कौतुकाची थाप ही अर्थातच माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे".

# काँग्रेस उमेदवार विजयी करा

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

केंद्र, राज्य व मनपा मध्ये सलग सत्तेत राहून देखील महापालिका निवडणूकीत, स्थानिक नेते सोडून मोदी-फडणवीसांची होर्डिंग लावणे, हे एकप्रकारे भाजप'च्या अपयशाची कबुली असून 'स्मार्ट सिटी'चा बोजवारा उडाला असून, सत्ताधारी भाजपासाठी 'मेट्रो सिटी'ची व्याप्ती केवळ एफएसआय'ची उधळण व अनियंत्रित बांधकामे करण्यापुरती असल्याचे सिद्ध होत असल्याची टिका काँग्रेस नेते गोपाळदादा तिवारी यांनी प्रभाग क्र १२, गोलंदाज चौक, वडारवाडी, छ शिवाजी नगर येथील जाहीर सभेत बोलताना केली..! ते पुढे म्हणाले की, स्थानिक महानगरपालिका या स्थानिक नागरिकांच्या इच्छेनुसार विकास कामे करतात. मात्र गेली चार वर्षे निवडणुका लांबल्याने, मनपा - प्रशासकीय काळात राज्यातील सत्ताधाऱ्यांच्या दबावा खाली मनपा ने अवास्तव धोरणे राबवून, मेट्रो च्या एफएसआय'ची अवास्तव उधळण केली.

# डॉ. मोहितच्या भूमिकेत दिसून येणार आहे रावजीत सिंग!

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**



शरद केळकर आणि निहारिका चौक्सी यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'तुम से तुम तक' टीआरपी यादीत सातत्याने आघाडीवर आहे. ही मालिका भावनिक कथानक आणि दमदार अभिनयामुळे प्रेक्षकांच्या मनात घर करून सध्या टॉप पाच मालिकांमध्ये स्थान टिकवून आहे. सध्या मालिकेच्या कथानकात भावनिक वळण आले आहे. अनुला कळते की आर्यवर्धनने यापूर्वी लग्न केले होते आणि त्याची पत्नी राजनंदिनी आता या जगात नाही. या खुलाशामुळे अनुला आर्यवर्धनचा भूतकाळ समजायला मदत होते, पण त्याच वेळी अनु आणि आर्यवर्धन यांच्यात वाढणारी जवळीक पाहून मीरा मत्सराने अधिकच पेटते, ज्यामुळे कथानकात तणाव वाढतो. दरम्यान, मालिकेत एक नवीन पात्र दाखल होणार आहे, ज्यामुळे कथानकात नवे स्तर आणि रोचक वळणे येणार आहेत. अभिनेता रावजीत सिंग हा डॉ. मोहित या दयाळू आणि कुशल हृदय शल्यचिकित्सकाच्या भूमिकेत दिसणार आहे. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना रावजीत सिंग म्हणाला, "मी डॉ. मोहितची भूमिका साकारत आहे. तो एक हृदय शल्यचिकित्सक आहे. अनु आणि तिच्या कुटुंबाची त्याच्याशी पहिली भेट रुग्णालयात होते. या पात्रामुळे अनु आणि आर्यवर्धनच्या आयुष्यात अनेक नवे वळण येणार आहेत. ती वळणे काय असतील, हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षकांना मालिका पाहावी लागेल.

डॉ. मोहित या पात्राबद्दल बोलायचे झाले तर तो आपल्या कामावर प्रेम करणारा, म्हणजेच जीव वाचवण्याचे काम करणारा व्यक्ती आहे. त्याच्यात अपार संयम आहे आणि रुग्णसेवेसाठी तो कोणतीही मर्यादा ओलांडतो. अनेकदा रुग्णाची आर्थिक परिस्थिती पाहून तो स्वतःचे शुल्क कमी करतो. तो अत्यंत सुशिक्षित असूनही भारतीय संस्कृती, परंपरा आणि कौटुंबिक मूल्यांशी घट्ट जोडलेला आहे. नाती त्याच्यासाठी खूप महत्त्वाची आहेत. लहानपणीच त्याने वडिलांना गमावले, त्यामुळे त्याचे संगोपन आईने केले आणि तीच त्याच्या आयुष्याचा केंद्रबिंदू आहे." मालिकेत सहभागी होताना आपल्या आनंदाबद्दल रावजीत म्हणाला, "'तुम से तुम तक'चा भाग होऊन मला खूप आनंद झाला आहे कारण ही एक उत्तम मालिका आहे. ती सध्या खूप चांगली कामगिरी करत आहे आणि वाहिनीवरील क्रमांक एकची मालिका आहे.

# भारताच्या संघात तीन खेळाडूंचा समावेश

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



पुण्यातील अस्पायर फुटबॉल क्लबने भारताच्या महिला फुटसलच्या वाढीमध्ये मोलाचा वाटा उचलला आहे. त्याचे फलस्वरूप या क्लबच्या जिग्मेट चुनझेन, रितिका सिंग आणि पूजा गुप्ता या तिघींची थायलंडमध्ये होणाऱ्या पहिल्या सॅफ (SAFF) महिला फुटसल स्पर्धेसाठी (२०२६) भारताच्या महिला फुटसल संघात निवड झाली आहे.

ऐतिहासिक सॅफ स्पर्धेसाठी मुख्य प्रशिक्षक जोशुआह वाझ यांनी १४ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. उल्लेखनीय म्हणजे, गेल्या जानेवारीमध्ये झालेल्या एएफसी महिला फुटसल आशियाई कप २०२५ पात्रता फेरीत स्थान मिळवणाऱ्या संघातील सात खेळाडूंनी या संघात स्थान मिळवले आहे. भारतीय फुटसलसाठी एक ऐतिहासिक क्षण असलेल्या या स्पर्धेसाठी लडाखमध्ये राहणारी मिडफिल्डर जिग्मेट चुनझेन हिची कर्णधार म्हणून निवडण्यात आले आहे. या स्पर्धेद्वारे ती भारताच्या वरिष्ठ संघात पदार्पण करेल.

भारतीय महिला फुटसल संघात निवड होणारी लडाखमधील पहिली खेळाडू असल्याने जिग्मेटची निवड ऐतिहासिक ठरली आहे. जिग्मेटसह पूजा गुप्ता आणि रितिका सिंग या ॲस्पायर इंडियाच्या अन्य दोन खेळाडू सलग दुसऱ्यांदा राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. गेल्या जानेवारीमध्ये आंतरराष्ट्रीय फुटसल सर्किटमध्ये त्या भारतीय संघातून खेळल्या होत्या.

# शासकीय चित्रकला परीक्षेचा शंभर टक्के निकाल

## चैतन्याची शर्वरी आरोटे राज्यात ८१ वी

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**


SANTOSH KAMBLE SIR

ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूरचा एलिमेंटरी व इंटरमिजिएट या शासकीय चित्रकला परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. विद्यालयाची विद्यार्थिनी शर्वरी राजेंद्र आरोटे ही राज्य गुणवत्ता यादीत ८१ वी आली. या दोन्ही परीक्षेस विद्यालयातील १४७ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी अ श्रेणी २८ विद्यार्थ्यांना, ब श्रेणी ५१ विद्यार्थ्यांना व क श्रेणी ६८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली.अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली .

शासकीय चित्रकला परीक्षा महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ आणि कला संचलनालय महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत घेतली जाते. चैतन्य विद्यालय ओतूर मध्ये शासकीय चित्रकला परीक्षेचे केंद्र आहे . या परीक्षेला परिसरातील वीस माध्यमिक शाळांचे ६४३ विद्यार्थी बसले होते.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना कलाक्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी पात्र ठरविणे हा या परीक्षेचा उद्देश आहे. विद्यालयात दरवर्षी अनेक विद्यार्थी या परीक्षेत बसतात. त्यांच्या या यशामागचे कारण सातत्यपूर्ण सराव,मेहनत व एकाग्रता आहे.या परीक्षेस अ , ब व क श्रेणी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे दहावीच्या परीक्षेत सात , पाच व तीन असे वाढीव गुण मिळतात. अशी माहिती कलाविभाग प्रमुख संतोष सोनवणे यांनी दिली .

इंटरमिजिएट परीक्षेत अ श्रेणी प्राप्त विद्यार्थी : शर्वरी राजेंद्र आरोटे( राज्य गुणवत्ता यादीत ८१वी ) , आदित्य संतोष फापाळे,अंजली योगेश खेत्री,अथर्व विठ्ठल कुटे, गार्गी राजेंद्र आरोटे,नंदिनी दीपक पाचपुते ,नियती मनोज पटेल , पलक रामदास डोंगरे ,श्रुती बाळू नलावडे ,वरद चंद्रशेखर नलावडे .

एलेमेंटरी परीक्षेत अ श्रेणी प्राप्त विद्यार्थी : आराध्य प्रभाकर दिघे,आराध्या मंगेश डुंबरे ,आर्या जीवन गाढवे , तन्वी प्रशांत डुंबरे,तेजल कैलास देवकर,यश्मी योगेश हांडे, सुप्रभा बाळासाहेब साबळे, स्वराज तुकाराम गायकर,शुभदा सुहास बनकर,सोनाली जितेंद्र इसकांडे,सृष्टी महादेव तौर, समृद्धी उमेश डुंबरे , रसिका प्रमोद लांडगे , ज्ञानेश्वरी विजय मांडे,कार्तिक संजय गायकर, आर्या विक्रांत बनकर,भार्गव संतोष लोहके ,दिव्या दत्तात्रय हाडवळे .

या यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे कलाशिक्षक संतोष सोनवणे व बाळासाहेब साबळे यांनी मार्गदर्शन केले

सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे,प्रभाकर तांबे,राजेंद्र डुंबरे,रघूनाथ तांबे,प्रदीप गाढवे,पंकज घोलप,रोहीदास घुले,मुख्याध्यापिका राजश्री भालेकर,संजय हिरे,अनिल उकिरडे,अजित डांगे यांनी अभिनंदन केले.

# सिंटेक्सने अँटी-मायक्रोबियल CPVC पाईप्स केले लाँच

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

सिंटेक्स बाय वेल्स्पन, या भारताच्या आघाडीच्या तसेच मोठ्याप्रमाणावर विश्वासू दर्जेदार जल संग्रहण समाधानांच्या निर्मात्यांनी, आज जगातील सर्वप्रथम एंटी-मायक्रोबिअल CPVC पाइप्सच्या परिचयाची महाराष्ट्रच्या पुणे शहरात घोषणा केली. या घोषणेमुळे त्यांनी जल संग्रहणातील आपल्या 50 वर्षांच्या परंपरेला मजबूती देत जल वितरण क्षेत्रात धोरणात्मक विस्ताराला चिन्हांकीत केले आहे. सिंटेक्सने पाइपची संपूर्ण रेंज आणली आहे- CPVC, UPVC, SWR (सॉइल, वेस्ट आणि रेन वॉटर), रीक्लेम, ॲग्री, अंडरग्राउंड ड्रेनेज & सरफेस ड्रेनेज पाइप आणि फिटिंग्जमध्ये पुन्हा आपला हक्क सांगितला आहे. या पाइपांची रचना गरम आणि थंड पाण्याला, ग्रेवॉटर आणि ब्लॅकवॉटरला सक्षमपणे व्यवस्थापित करण्यासाठी केलेली




असून प्लंबिंगच्या सर्व गरजा पूर्ण केल्या गेल्या आहेत. विशेषकरुन SWR आणि अंडरग्राउंड ड्रेनेज पाइप उंदीर प्रतिबंधक गुणविशेषांसह येतात, ज्यामुळे सुधारीत टिकाऊपणा आणि सुरक्षेची हमी मिळते. सिंटेक्स महाराष्ट्राला एक महत्त्वाचा बाजार मानतो आणि राज्यात आपली उपस्थिती अधिक वाढवण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. या धोरणात्मक प्रवेशाद्वारे, सिंटेक्स नवीनता, गुणवत्ता आणि आरोग्य-प्रथम अभियांत्रिकीद्वारे भारताच्या बदलत्या पायाभूत सुविधा गरजांची पूर्तता करण्याचा उद्देश ठेवतो. या पाइपांची रचना दीर्घकालीनता आणि दर्जाच्या सर्वोच्च मानकांवर करण्यात आली आहे, सोबत आरोग्य आणि स्वच्छतेवर देखील अधिक भर देण्यात आला आहे. काहीही झाले तरी सुरक्षा प्रथम या तत्वावर प्रत्येक कुटुंबासाठी अधिक निरोगी घरे आणि सुरक्षित पाणी असण्यासाठी ही रचना करण्यात आली आहे. अशाप्रकारे, सिंटेक्सने छत्तीसगड, पंजाब, राजस्थान आणि चंदिगडमध्ये आपल्या पाइपांचा परिचय करुन दिला आहे. वेलस्पन बीएपीएल लि.चे मॅनेजिंग डायरेक्टर आणि सिंटेक्सचे डायरेक्टर, श्री.यशोवर्धन अग्रवाल म्हणाले, "५० वर्षांपासून, सिंटेक्स भारतातील लाखो घरांमध्ये सुरक्षित आणि विश्वासार्ह जलसंग्रहणाचे नेतृत्व करत आहे. पुण्यामध्ये CPVC पाइपचा सिंटेक्सने करुन दिलेला परिचय, त्याच दर्जा आणि नवीनतमतेच्या मानकांवर पाणी वितरणाच्या आव्हानाचा सामना करण्यासाठी आम्ही पुढे टाकलेले पाऊल दर्शवतो. जगामध्ये सर्वप्रथमत: एंटी-मायक्रोबिअल CPVC पाइपचा परिचय करुन देणे म्हणजे केवळ नवीन श्रेणीत प्रवेश करणे नसून, हा उपक्रम म्हणजे आपल्या जल कथेचा आणखीन विस्तार करणे आणि समग्र, आरोग्यदायी जल व्यवस्थापन समाधान उपलब्ध करुन देण्याबद्दल आहे." भारतातील पाइप उद्योग FY30पर्यंत 1.3 लाख करोड पर्यंत पोहोचण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे आणि तो अतिशय वेगाने वाटचाल करत आहे. परंतु, संशोधनामध्ये असे दिसून आले आहे की बाजारपेठेत अंदाजे 60% भाग व्यवस्थापीत नसून, त्यावर कमी-दर्जाच्या, ब्रँड नसलेल्या रिसायकल प्लॅस्टिक) पाइपांचा प्रभाव आहे.

ही अव्यवस्थापीत बाजारपेठ सिंटेक्सला आपल्या दर्जा, नवीनतमता आणि विश्वासार्हतेने राज्य करण्याची नामी संधी आहे असे म्हणता येईल.

# मुलींच्या गटात बीएनसीए संघाला विजेतेपद

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वुमेन (बीएनसीए) तर्फे आयोजित टॉर्क २०२६ अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलींच्या गटात महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वुमेन (बीएनसीए) संघाने, तर, मुलांच्या गटात सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पुणे संघाने विजेतेपद संपादन केले.



महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या आवारातील मैदानावर ३ ते ५ जानेवारी २०२६ दरम्यान पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम लढतीत मुलींच्या गटात महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वुमेन (बीएनसीए) संघाने पी. व्ही. पी. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघाचा 15-09 असा पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली.

मुलांच्या गटात सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पुणे संघाने संघाने भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघाचा 15-11 असा पराभव करून विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत पुणे शहरातील आर्किटेक्चर व डिझाईन महाविद्यालयांचे एकूण 10 संघ सहभागी झाले होते.

स्पर्धेचे उद्‌घाटन बीएनसीएचे उपप्राचार्य डॉ. शार्वेय धोंगडे यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये प्राध्यापक उमेश चव्हाण यांनी संपूर्ण स्पर्धांचे आयोजन उत्कृष्ट आणि यशस्वी पद्धतीने केले.

स्पर्धेतील विजेत्या संघांना करंडक, प्रमाणपत्र, पदके व रु. १२,००० रोख रक्कम, तर उपविजेत्या संघांना करंडक, प्रमाणपत्र, पदके व रु. ८,००० रोख रक्कम प्रदान करण्यात आली.

# सहावा पुणे पर्यटन महोत्सव १६ ते १८ जानेवारीला

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन विकासासाठी भारतीय पर्यटन विकास सहकारी संस्थेच्या वतीने आयोजिला जाणारा 'पुणे पर्यटन महोत्सव' अर्थात पुणे ट्रॅव्हल फेस्टिवल यंदा १६ ते १८ जानेवारी २०२६ या कालावधीत हॉटेल सेंट्रल पार्क, डेक्कन पुणे येथे होणार आहे. तीनही दिवस हा महोत्सव सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत सर्व पुणेकरांसाठी विनामूल्य खुला राहणार आहे, अशी माहिती भारतीय पर्यटन विकास सहकारी संस्थेचे चेअरमन प्रवीण घोरपडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्थेचे सचिव प्रथमेश कुलकर्णी, खजिनदार हेमंत जानी, संचालक संतोष माने, सजेश पिल्ले, आशिष हिंगमिरे, अमित कुलकर्णी, चंदन पठारे आदी उपस्थित होते. प्रवीण घोरपडे म्हणाले, "पुणे पर्यटन महोत्सवाचे यंदा सहावे वर्ष




आहे. महोत्सवाचे उद्‌घाटन येत्या शुक्रवारी (दि. १६) सकाळी १० वाजता प्रसिद्ध गायिका डॉ. राधा मंगेशकर व पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक भरत लांघी यांच्या हस्ते होणार आहे. या महोत्सवात नामांकित ७० पेक्षा अधिक पर्यटन कंपन्या आपले सहलींचे पर्याय सादर करणार आहेत. त्याशिवाय विविध सांस्कृतिक कार्यक्रम, कॉर्पोरेट ट्रॅव्हल अँड टुरिझम मीट, काश्मीर टुरिझम, महाराष्ट्र टुरिझम, मानसरोवर यात्रा यावर चर्चासत्रे होणार आहेत. 'एकटीचा सफरनामा' हे डॉ. राधा मंगेशकर यांचे अनुभवकथन ऐकता येणार आहे." "या महोत्सवासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी), पर्यटन संचालनालय, पर्यटन मंत्रालय, पुणे विमनातळ प्रशासन, पुणे रेल्वे स्टेशन, पासपोर्ट कार्यालय, मेट्रो प्रशासन, पीएमपीएल प्रशासन, ट्रॅव्हेल एजन्सी असोसिएशन्स, हॉटेल रेस्टोरंट असोसिएशन्स, रिसॉर्ट्स असोसिएशन, कृषी पर्यटन असोसिएशन, लोकल टूर गाईड्स, इव्हेंट मॅनेजमेंट आदी विभागातील पदाधिकारी व अधिकारी यांना निमंत्रित केलेले आहे.

राज्याच्या पर्यटन विकासासाठीच्या या महोत्सवात विविध मान्यवर चर्चा करणार आहेत," असेही त्यांनी नमूद केले.

# 15 जानेवारीस मतदान

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील 29 महानगरपालिकांसाठी येत्या 15 जानेवारी 2026 रोजी सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणूकीमध्ये मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यासाठी उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कामगार कर्मचाऱ्यांना या दिवशी सुट्टी किंवा सवलत देणे बंधनकारक करण्यात आल्याचा शासन निर्णय उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केली आहे. महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्र शासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका, शैक्षणिक तत्सम आस्थापनांनाही ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# संशोधकांचा इन्फोसिस पुरस्कार २०२५ देऊन गौरव

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

■ नोबेल पारितोषिक विजेते रँडी शेकमन यांच्या हस्ते सहा विजेत्यांना सुवर्णपदक, प्रशस्तिपत्र आणि १००,००० अमेरिकन डॉलर्स बक्षीस देऊन सन्मान

इन्फोसिस सायन्स फाउंडेशनने (आयएसएफ) आज बंगळुरू येथे आयोजित एका सत्कार समारंभात इन्फोसिस पुरस्कार २०२५ च्या विजेत्यांना सन्मानित केले. हे पुरस्कारांचे १७ वर्ष असून त्यातून ४० वर्षांखालील संशोधकांचा गौरव करून अद्वितीय प्रतिभेची ओळख पटवतो. अर्थशास्त्र, अभियांत्रिकी आणि संगणक विज्ञान, मानव्यविज्ञान आणि सामाजिक विज्ञान, जीवन विज्ञान, गणितीय विज्ञान आणि भौतिक विज्ञान या सहा श्रेणींमध्ये उत्कृष्ट योगदानासाठी विजेत्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. टोरंटो विद्यापीठातील गणितीय आणि संगणकीय विज्ञानाचे सहयोगी प्राध्यापक (सीएससी) सुशांत सचदेवा, शिकागो विद्यापीठातील दक्षिण आशियाई भाषा आणि संस्कृती विभागातील सहयोगी प्राध्यापक अँड्र्यू ऑलेट, बंगळुरू येथील नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेस येथील सहयोगी प्राध्यापक अंजना बद्रीनारायणन, मुंबईतील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च येथील स्कूल ऑफ मॅथेमॅटिक्समधील सहयोगी प्राध्यापक सब्यसाची मुखर्जी, भौतिक विज्ञानातील इन्फोसिस पुरस्कार २०२५ कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (कॅलटेक) येथील केमिकल इंजिनिअरिंगचे प्राध्यापक कार्तिश मंथिराम विजेत्यांना मुख्य पाहुणे २०१३ चे शरीरविज्ञान/औषधातील नोबेल पुरस्कार विजेते, कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले येथील आण्विक आणि पेशी जीवशास्त्र विभागाचे प्राध्यापक आणि हॉवर्ड ह्यूजेस मेडिकल इन्स्टिट्यटचे संशोधक प्रो. रँडी शेकमन यांनी सुवर्णपदक, प्रशस्तिपत्र आणि १००,००० अमेरिकन डॉलर्सच्या बक्षीस रकमेसह सन्मानित केले. या कार्यक्रमात जगभरातील प्रतिष्ठित शास्त्रज्ञ, प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ, व्यावसायिक नेते, तरुण विद्वान आणि विद्यार्थी उपस्थित होते. इन्फोसिस सायन्स फाउंडेशनचे विश्वस्त श्री. के. दिनेश (अध्यक्ष, विश्वस्त मंडळ), श्री. नारायण मूर्ती, श्री. क्रिस गोपालकृष्णन, श्री. एस. डी. शिबुलाल, श्री. मोहनदास पै, श्री. नंदन नीलेकणी आणि श्री. सलील पारेख हे पुरस्कार सोहळ्याला उपस्थित होते. या निमित्ताने बोलताना प्रमुख पाहुणे प्रो. रँडी शेकमन म्हणाले, "मूलभूत आणि उपयोजित नैसर्गिक आणि सामाजिक विज्ञानाच्या विविध क्षेत्रात भारतावर प्रभाव पाडणाऱ्या विद्वानांच्या उत्कृष्ट कामगिरीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २०२५ च्या इन्फोसिस पुरस्काराच्या विजेत्यांचे अभिनंदन करताना मला आनंद होत आहे. जगातील एक महान संस्कृती आणि सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारत संपूर्ण जगभरात विद्वत्तापूर्ण कामगिरीत नेतृत्व करतो.

जागतिक समुदायाच्या आरोग्य आणि समृद्धीसाठी योगदान देण्यात भारतीय लोकांच्या तेजस्वी कार्याचा आणि मेहनतीचा मी साक्षीदार आहे. वाढत्या ध्रुवीकरण झालेल्या जगात भारतातील सर्वोत्तम विद्वानांच्या रचनात्मक प्रभावावर विचार करणे महत्त्वाचे आहे."

# रोबोटिक्सची भूमिका या विषयावर सीएमईचे आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

नोबल हॉस्पिटल्स अ‍ॅन्ड रिसर्च सेंटर आणि एसएस इनोव्हेशन्स यांच्या सहकार्याने नुकतेच रोबोटिक सर्जरी : पॉवरिंग द फ्युचर या विषयावर सीएमई (कंटिन्युईंग मेडिकल एज्युकेशन) कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. हा सीएमई कार्यक्रम विशेषत: कर्करोग शल्यचिकित्सक,जनरल सर्जन्स,युरो-सर्जन्स आणि स्त्रीरोग तज्ज्ञांसाठी आयोजित करण्यात आला होता. या सीएमई मध्ये तज्ज्ञांची व्याख्याने,चर्चासत्रे तसेच संवादात्मक प्रश्नोत्तरे सत्रांचा समावेश होता.यामध्ये कोलोरेक्टल सर्जरी,जनरल सर्जरी,युरोलॉजी आणि स्त्रीरोग शल्यचिकित्सेत रोबोटिक्सची वाढती भूमिका यावर विशेष भर देण्यात आला.



या कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी नोबल हॉस्पिटल्स अ‍ॅन्ड रिसर्च सेंटरचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.दिलीप माने, संचालक डॉ.दिविज माने, समुह कार्यकारी अधिकारी डॉ.संजय पठारे,संचालक डॉ.एच.के.साळे यांसह फोर्टिस हेल्थकेअरमधील सर्जिकल आँकोलॉजीचे संचालक डॉ.अविनाश सखलानी, मुत्ररोगतज्ज्ञ व मुत्रपिंड प्रत्यारोपण तज्ञ डॉ.रितेश मोंघा,रोबोटिक स्त्रीरोग शस्त्रक्रिया तज्ञ व अ‍ॅपेक्स हॉस्पिटलच्या संचालिका डॉ.लीना मेहरोत्रा आणि नोबल हॉस्पिटलमधील रिप्रॉडक्टीव्ह मेडिसिन विभागातील मानद प्राध्यापिका डॉ.लिझेलॉट मेटलर आदी नामवंत तज्ञ उपस्थित होते. उपस्थित तज्ज्ञांनी रोबोटिक शस्त्रक्रियेमधील वैद्यकीय परिणाम,तांत्रिक प्रगती आणि भविष्यातील प्रवाहांवर सखोल चर्चा केली.रोबोटिक प्लॅटफॉर्ममुळे शस्त्रक्रियेतील अचूकता,सुरक्षितता आणि रूग्णांच्या उपचार परिणामांवर कसा प्रभाव पडत आहे,यावर त्यांनी प्रकाश टाकला.या सीएमई कार्यक्रमातून सहभागी डॉक्टरांना 2 एमएमसी गुण देण्यात आले.

नोबल हॉस्पिटल्स अ‍ॅन्ड रिसर्च सेंटरचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.दिविज माने म्हणाले की,रोबोटिक शस्त्रक्रियेमुळे शस्त्रक्रियेनंतर होणाऱ्या वेदना व अस्वस्थता लक्षणीयरित्या कमी होते,तसेच रूग्णांचा बरे होण्याचा कालावधीही अधिक जलद असतो. हा उपक्रम वैद्यकीय शिक्षण, नवकल्पना आणि उच्च दर्जाची रूग्णसेवा वाढविण्याच्या आमच्या वचनबध्दतेचा एक भाग आहे. शल्यचिकित्सा क्षेत्रात अशा उत्कृष्ट तंत्रांचे मापदंड प्रस्थापित करून सर्वांसाठी अधिक दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे,हे आमचे ध्येय आहे. नोबल हॉस्पिटल्स अ‍ॅन्ड रिसर्च सेंटरमधील आँको सर्जन डॉ.आशिष पोखरकर म्हणाले की,एसएसआय मंत्रा 3 रोबोटिक सर्जरी प्लॅटफॉर्म्समुळे खुली शस्त्रक्रिया किंवा लॅप्रोस्कोपिक दृष्टीकोनाच्या तुलनेत अगदी गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांमध्ये देखील अचूकता, कमी रक्तस्त्राव आणि जलद पुर्नप्राप्ती साध्य करता येते.

# सुधारित वेळापत्रक जाहीर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा 2025-26 या राज्यव्यापी उपक्रमाच्या वेळापत्रकात सुधारणा करण्यात आली आहे.या उपक्रमासाठीची ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया आता 16 जानेवारी 2026 पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर यांच्यामार्फत घेण्यात येणारे परीक्षापूर्व 15 दिवसांचे ऑनलाईन संविधान प्रशिक्षण 18 जानेवारी 2026 पासून सुरू होणार आहे. हा उपक्रम महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोगाचे उपाध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून, यामध्ये इयत्ता 8 वी ते पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे.

# भारतीय शास्त्रीय संगीताची एक संस्मरणीय संध्या – युवा सृजन २०२६ ने पुणेकरांना मंत्रमुग्ध केले

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स लिमिटेड यांच्यासोबतच्या सीएसआर भागीदारीअंतर्गत प्रतिमा चॅरिटेबल फाउंडेशनने पुणे इंटरनॅशनल सेंटर येथे 'युवा सृजन' कार्यक्रम सादर केला. या संध्याकाळी शास्त्रीय संगीतप्रेमी व विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

'युवा सृजन' हा प्रतिमा चॅरिटेबल फाउंडेशनचा उपक्रम असून, उदयोन्मुख कलाकारांना भारतीय शास्त्रीय संगीतातील ज्येष्ठ कलाकारांसोबत शिकण्याची आणि सादरीकरण करण्याची संधी देतो.

या संध्याकाळी अश्विन बापट यांचे मनमोहक संतूर वादन झाले, त्यांना तबल्यावर मैestro पंडित रामदास पाळसुळे यांनी साथ दिली. यानंतर रश्मी मोघे आणि समूहाचे मधुर गायन सादरीकरण



झाले. रश्मी यांनी भजने, अभंग, गझल आणि कव्वाली अशा विविध संगीतप्रकारांचे सादरीकरण केले.

या कार्यक्रमाला सुदिप्तो मर्जित – सीएचआरओ, टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स लिमिटेड, आरती किर्लोस्कर – संचालक, एस. एल. किर्लोस्कर सीएसआर फाउंडेशन, दिनानाथ खोळकर – अध्यक्ष, पुणे इंटरनॅशनल सेंटर, डॉ. सुनिता गोयल, रुजुता सोमण, तसेच डॉ. जयश्री आणि पंडित पालांडे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाविषयी सुदिप्तो मर्जित म्हणाले, "युवा सृजन हा उदयोन्मुख आणि अनुभवी कलाकारांना एकत्र आणण्याचा आमचा प्रयत्न आहे—मंचावर त्यांची ऊर्जा पाहून खात्री पटते की आपण शास्त्रीय कलेचे जतन करत असतानाच तिला नव्या रूपात साकारत आहोत."

प्रतिमा चॅरिटेबल फाउंडेशनचे संस्थापक डॉ. प्रतिक पालांडे म्हणाले, "आमच्यासाठी युवा सृजन म्हणजे शास्त्रीय संगीत आणि नृत्य या केवळ स्मरणात राहणाऱ्या नव्हे तर जगल्या जाणाऱ्या परंपरा राहाव्यात यासाठीचा प्रयत्न आहे. गुरू-शिष्य परंपरेतून चालणारे शिक्षण भारतीय शास्त्रीय कलेची मूळ ओळख जपत तिच्या नैसर्गिक विकासाला चालना देते."

# अंडाशयातील ६ किलो गाठ काढण्यात यश

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मेडिकव्हर हॉस्पिटल्स, भोसरी येथे ४० वर्षीय महिला रुग्ण श्रीमती ताई केवळ यांच्या अंडाशयातील सुमारे ६ किलो वजनाची प्रचंड गाठ यशस्वीपणे काढून टाकण्यात आली. अत्यंत गुंतागुंतीची व जीव वाचवणारी ही शस्त्रक्रिया वैद्यकीय क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण यश मानली जात आहे. ही शस्त्रक्रिया डॉ. मधुश्री माने आणि डॉ. आशिष बांगार यांच्या नेतृत्वाखाली, बहुवैद्यकीय तज्ज्ञांच्या समन्वयातून पार पडली. गेल्या सहा महिन्यांपासून रुग्णाला पोट फुगणे, तीव्र अस्वस्थता तसेच श्वास घेण्यास त्रास होत होता, ज्यामुळे दैनंदिन जीवन मोठ्या प्रमाणात बाधित झाले होते. सखोल तपासणीनंतर रुग्णाच्या उजव्या अंडाशयात २४ × २० × १८ सेमी आकाराची 'जायंट राईट ओव्हेरियन



सिरस सिस्टॅडेनोमा' असल्याचे निदान झाले. ही गाठ पूर्णकालीन गर्भाच्या आकाराइतकी मोठी होती. गाठीचा आकार प्रचंड असल्याने आणि फुटण्याचा धोका असल्याने शस्त्रक्रिया अत्यंत आव्हानात्मक होती. सर्व अडचणींवर मात करत डॉक्टरांच्या चमूने राईट ओव्हेरियन सिस्टेक्टॉमीसह सॅल्पिंगो-ओओफोरेक्टॉमी ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे केली. संपूर्ण गाठ न फुटता काढण्यात आली.

# कंधार नगरपरिषद उपाध्यक्ष पदावर कोण होणार विराजमान?

■ नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष मो. जफरोद्दीन बाहोद्दीन की, माजी उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी?

■ आ. चिखलीकर भूमिका काय?

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

कंधार नगरपरिषद निवडणूक संपली आता उपाध्यक्ष पदावर कोण बसणार यांची मात्र चर्चा व निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे.दि १५ रोजी निवड होणार असल्यांची माहिती समोर आली आहे . लोहा कंधार मतदार संघाचे आमदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते प्रताप पाटील चिखलीकर यांची भूमिका यांचा आशीर्वाद कोणत्या नगरसेवकावर असणार हे मात्र कळत नसल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे राष्ट्रवादीचे १० अपक्ष एक शिवसेना शिंदे गट १ असे मिळून १२ राष्ट्रवादी काँग्रेस कडे नगरसेवक संख्याबळ असल्याचे दिसून येत आहेत व अपक्ष उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे व शिंदे गटाचा नगरसेवक त्यांनीही आमदार चिखलीकर यांच्या नगरसेवकांना पाठिंबा देण्याचे जाहीर केली आहे . त्यासाठी त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक १२ संख्या आहे.

तर काँग्रेस पक्षाकडे ५ पाच तर वंचित बहुजन आघाडी १ आसे काँग्रेस पक्षाकडे ६ संख्याबळ असल्यामुळे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यामध्ये फार मोठा फरक आहे त्यासाठी शहरात एकच चर्चा सुरू झाली आसे की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे १२ संख्याबळ असून सुद्धा उपाध्यक्ष कोण? हे मात्र अजूनही बाहेर आलं नाही राजकीय व सामाजिक काही पक्षाचे नेत्यांमध्ये चर्चा सुरू असल्याचे दिसून येत आहे की माजी उपनगराध्यक्ष मन्नानभाई चौधरी यांची व माझी नगराध्यक्ष मो.जफरोद्दीन बाहोद्दीन यांच्या नावात चर्चा अनेक ठिकाणी होत आहे . राष्ट्रवादीचे नेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची भूमिका महत्वाची असणार आहे नेमकं माळ कोणाच्या गळ्यात जाणार हे मात्र चिखलीकर ठरवतील त्यांनी ठरविलेलं व त्यांचा हार कुणाच्या गळ्यात जाणार हे मात्र दि. १५ रोजी सकाळी की दुपार कळल अशी ही चर्चा सुरू आहे .

माजी नगराध्यक्ष की माजी उपनगराध्यक्ष कोन ?होनार.... कंधार नगर परिषद उपनगराध्यक्ष कोण ...

काँग्रेस पक्षांचे नगराध्यक्ष ज्यांची भूमिका काय असनार कारण त्यांच्याकडे एक पद आसनार असुन हे पद मात्र कोणाला जाईल यांच्याकडे पण जनतेच व नागरिकांचे लक्ष असल्याचे दिसून ऐत आहे.

काँगेस पक्षाचा स्विकुत सदस्यांची ही निवड होणार आहे. काँग्रेस पक्षाकडून कुणाचं नाव समोर ऐईल सध्याला तर चर्चेमध्ये दिसत आहे .काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ माजी उपनगराध्यक्ष म. हमीद म.सुलेमान ,भोसीकर , डॉक्टर बडवणे ,काँग्रेस पक्षामध्ये युवा चेहरा म्हणून रब्बानी शेख ,माजी नगरसेवक. शेख रब्बानी चाऊस, यांच्या निवडणुकीमध्ये त्यांचे निधन झाले त्यांच्या परिवाराला मिळणार का? यांची पण नावाची चर्चा रगत असल्याचे दिसून येत आहे.

माजी नगराध्यक्ष अरविंद नळगे, व नगराध्यक्ष शहाजी नळगे यांचा हात कोणाच्या डोस्क्यावर पडल हे मात्र काही कळत नसल्या कारणामुळे फक्त चर्चा होत आहे .कोण होणार ?

## आ.चिखलीकर यांच्या आशीर्वाद कोणावर ?

लोहा कंधार आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या भूमिकीकडे सर्वांचे लक्ष लागले असल्याचे दिसुन येत आहे. चिखलीकर यांचे विश्वासू निष्ठावंत कार्यकर्ते संख्या जास्त असल्या कारणामुळे त्यांच्याकडे पण महत्त्वाचा मुद्दा असणार असून अनेकांचे लक्ष आ.चिखलीकर यांच्याकडे असणार आहे . स्विक्रुत सदस्यांची निवड कोनाची होणार आहे. आमदाराचा आशीर्वाद कोणत्या कार्यकर्त्यावर असणार अनेक प्रभागांमध्ये अनेक कार्यकर्त्यांची महत्वाची भूमिका राहिली आहे . प्रभागामध्ये अनेक उमेदवार असून सुद्धा त्यांचा थोडाफार मताने पराभव झाला अशा उमेदवारांची निवड होणार की नविन कार्यकर्त्यांना संधी मिळणार याकडे मात्र सर्वांचे लक्ष लागत आहे. आनके नावची चर्चा सुरु असून स्वप्रिल पाटील लुंगारे, माजी गग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष गंगाधर कांबळे , निलेश गौर, कोण होणार नवीन चेहऱ्यांना संधी मिळेल का? असी चर्चा अनेक ठिकाणी होत आहे .